



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६४ वे * अंक ३३२ * नांदेड * शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# केंद्रीय कृषिमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव; महाराष्ट्रातील २५ खासदारांच्या सह्या

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यावर सभागृहात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. यावर महाराष्ट्रातील २५ खासदारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीबाबत राज्य सरकारची मोठी अनास्था असल्याचे प्रकरण समोर आले आहे. राज्य सरकारने मदतीसाठी केंद्राला प्रस्तावच पाठवला नसल्याची माहिती पुढे आल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये अतिवृष्टी अनुदानावरुन खडाजंगी पाहायला मिळाली. विशेष म्हणजे केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी २ डिसेंबर रोजी संसदेत लेखी उत्तरात माहिती दिली. सोबतच अतिवृष्टी झालेल्या क्षेत्राची माहिती देण्यातही राज्य सरकारची गंभीर चूक असल्याचे दिसून आले. १४ लाख हेक्टरवर नुकसान झालं असताना केंद्राला मात्र १.१० लाख हेक्टरचाच आकडा देण्यात आला. त्यावरुन आता खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय कृषिमंत्र्यांविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. कृषीमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचं ओमराजे यांनी म्हटलं आहे.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत एनडीआरएफच्या निकषाप्रमाणे मिळावी, यासाठी राज्य सरकारने केंद्राकडे प्रस्तावच पाठवला नाही. लोकसभेतील खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या तारांकित प्रश्नाला केंद्रीय कृषीमंत्र्यांनीच लेखी उत्तर दिलं. राज्यभरात अतिवृष्टीमुळे ७५.४२ लाख हेक्टर वरील पिकाचे नुकसान, तर ३५९८ घरांचे नुकसान झालं आहे. महापुराच्या विळख्यात २२४ लोकांचा मृत्यू, तर ५९९ जनावर मृत्युमुखी पडल्याची लेखी उत्तरात माहिती आहे. दरम्यान, केंद्र सरकारनेच स्पष्टपणे याबाबत माहिती दिली आहे. राज्य सरकारने प्रस्ताव वेळेत दिला असता तर तात्काळ मदत मिळण्यास मोठी मदत झाली असती, असे ओमराजे यांनी म्हटलं होतं. मात्र, राज्य सरकारने प्रस्ताव पाठवल्याचं मुख्यमंत्र्यांनी म्हटलं. त्यावरुन, विरोधक आक्रमक झाले होते. त्यामुळे, राज्य सरकारच्या म्हणण्यानुसार कृषिमंत्र्यांनी सभागृहात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत ओमराजे निंबाळकर यांनी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे.

महाराष्ट्राकडून शेतकऱ्यांना मदतीसाठी निधी मागणारा प्रस्ताव आला आहे, असे असत्य विधान केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केल्याचा आरोप करत ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्षांकडे हक्क भंग दाखल केला आहे. या हक्कभंगाच्या प्रस्तावावर सुप्रिया सुळे, अरविंद सावंत, वर्षा गायकवाड, अनिल देसाई, प्रतिभा धानोरकर, बळवंत वानखेडे, कल्याण काळे, संजय दिना पाटील, रवींद्र चव्हाण, अमर काळे, प्रशांत पडोले, शामकुमार बर्वे, बजरंग सोनावणे, निलेश लंके, प्रणिती शिंदे, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, धैर्यशील मोहिते पाटील, शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, अशा एकूण २५ महाविकास आघाडीच्या खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## महाराष्ट्रात अखेर कोल्ड वेव्ह धडकली

### नांदेडसह १३ जिल्ह्यांना अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील काही दिवसांपासून राज्यात हुडहुडी वाढली ओह. महाराष्ट्रात कोल्ड वेव्ह धडकली असून राज्यातील नांदेड जिल्ह्यातील १३ जिल्ह्यांना शीतलहरीचा इशारा देण्यात आला आहे.

राज्याच्या अनेक भागांमध्ये थंडीची तीव्र लाट असल्याचे पाहायला मिळत आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये कोल्ड वेव्हचा इशारा भारतीय हवामान शास्त्र विभागाच्या कुलाबा वेधशाळेने दिला आहे. मराठवाड्यातही थंडीच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. मराठवाड्यातील तब्बल पाच जिल्ह्यांना शीतलहरीचा इशारा देण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड या पाच जिल्ह्यांमध्ये किमान तापमान हे ७ ते ९ अंश सेल्सिअस दरम्यान राहणार आहे.

मुंबई शहर आणि उपनगरामध्ये मुख्यतः निरभ्र आकाश राहील, तर कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५ अंश सेल्सिअस एवढं राहील. १२ डिसेंबर नंतर मुंबईमध्ये किमान तापमानात वाढ होणार असून गारठ्यात कमी जाणवणार आहे. पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना हवामान विभागाने थंडीसाठी कोल्ड वेव्हचा इशारा दिला आहे. १२ डिसेंबर रोजी सोलापूरला शीतलहरीचा इशारा देण्यात आला आहे. तर पुणे आणि सोलापूर जिल्ह्याला कोल्ड वेव्हचा अलर्ट देण्यात आला आहे.

## आरक्षण मर्यादा प्रकरणी २१ रोजी अंतिम निर्णय



**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील नगर परिषद आणि नगर पालिका निवडणुका झाल्यानंतर आता जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिका निवडणुकांकडे लक्ष वेधले गेले आहे. या निवडणुका मिनी विधानसभेसारख्या ठरणार असल्याने राजकीय हालचालींना वेग आला आहे. राज्यातील २९ महापालिकांसोबत १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याबाबत हालचाली सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्के आरक्षण मर्यादा काटेकोरपणे पाळण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने नवीन निर्णय प्रक्रिया सुरू केली आहे. आरक्षण मर्यादा प्रकरणी दाखल याचिकांवर सुप्रीम कोर्ट २१ जानेवारीला अंतिम निर्णय देणार आहे.

पूर्वीच्या नियोजनानुसार, तीन टप्प्यांत निवडणुका घेण्याची तयारी होती. पहिल्या टप्प्यात नगर परिषद-नगर पालिका निवडणुका झाल्या. दुसऱ्या टप्प्यात ३२ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या, तर तिसऱ्या टप्प्यात २९ महापालिका निवडणुका घेण्याचा मानस होता. मात्र, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा न्यायालयीन वादात गेल्यानंतर संपूर्ण चित्र बदलले.

ओबीसी समाजाला २७ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयावर आक्षेप नोंदवल्याने आणि सर्वोच्च न्यायालयाने ५० टक्क्यांपर्यंतच आरक्षण मर्यादा ठेवण्याचे निर्देश दिल्यानंतर अनेक जिल्ह्यांमध्ये निवडणूक प्रक्रिया स्थगित ठेवावी लागली. त्यामुळे आयोगाने सावधगिरीचा उपाय म्हणून पुढील आदेशांपर्यंत निवडणुका न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने महापालिका निवडणुकांसह १२ जिल्हा परिषदांमध्ये मतदानाची तयारी सुरू केली आहे. मात्र, २० जिल्हा परिषद आणि ८८ पंचायत समित्यांच्या निवडणुका सुप्रीम कोर्टाच्या आगामी निकालावर अवलंबून राहणार आहेत.

## युनेस्कोच्या वारसा यादीत 'दिवाळी'चा समावेश

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भारताची गौरवशाली आणि निरंतर चालत आलेली परंपरा असलेल्या दीपावली सणाला अखेर जागतिक स्तरावर ऐतिहासिक मान्यता मिळाली. नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर नुकत्याच पार पडलेल्या युनेस्कोच्या आंतरशासकीय समितीच्या विसाव्या सत्रादरम्यान, दीपावलीचा मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या प्रातिनिधिक यादीत अधिकृतपणे समावेश करण्यात आला.

## रविंद्र चव्हाणांनी घेतली अमित शाहांची भेट

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील आगामी निवडणुकांची रणनीती, महायुतीचे गणित आणि मनपा सत्तेचे आकडे यावरून महाराष्ट्रातील राजकारण तापू लागले आहेत. नगर परिषदेच्या प्रचारांमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गट आमनेसामने आल्याने महायुतीमध्ये तणाव असल्याची चर्चा सुरू होती. या सगळ्यात दिल्लीत महायुतीबाबत मोठी घडामोड झाली. दिल्लीमध्ये मध्यरात्री उशिरा एक महत्त्वाची बैठक पार पडल्याची माहिती पुढे आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातील सध्याच्या राजकीय समीकरणांबाबत चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.


मुख्यमंत्री फडणवीस एकनाथ शिंदे बैठकीत आगामी मनपा निवडणुकीतील धोरणे, संभाव्य महायुती, उमेदवारी, तसेच स्वतंत्र लढण्याच्या पर्यायांवर मोठ्या प्रमाणात चर्चा झाल्याचे कळते. या चर्चेचा सारांश चव्हाण यांनी थेट अमित शाह यांच्याकडे सोपवला असल्याचे सूत्रांनी सांगितले.

## अमित शाहांनी मला हिंदुत्व शिकवण्याची गरज नाही, उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

**नागपूर (प्रतिनिधी)–** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरूवारी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विधिमंडळात जाऊन शिवसेना आमदार व पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यानंतर, पत्रकार परिषद घेत नागपूरच्या अधिवेशनातून विदर्भाला काय मिळालं? असा सवाल उपस्थित केला. तसेच, गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अल्पसंख्यांकांच्या व्होटबँकेवरून केलेल्या टीकेवरूनही उद्धव ठाकरे यांनी पलटवार केला.

कोण होतास तू, काय झालास तू.. अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंवर केली होती. यावेळी, अमित शाह यांच्या संसदेतील भाषणाचा व्हिडिओ देखील फडणवीसांनी शेअर केला होता. त्यावर, भ्रष्टाचारी लोकांना पांघरुनात घेतले आहे, असे म्हणत पलटवार केला.

मला मुख्यमंत्र्यांची दया येते की कोण होतास तू काय झालास तू, एवढ्या सगळ्या भ्रष्टाचाऱ्यांना जवळ घेतलंस तू, स्वत:च्या पांघरुणात घेतलंस तू, काय होतास तू काय झालास तू, भ्रष्टाचाऱ्यांना पांघरुणात घेतलंस तू असे म्हणत उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांच्या टीकेला प्रत्त्युत्तर दिलं. तसेच पाकिस्तानशी खेळले जाणारे क्रिकेट सामने, रिजूजी यांचे गोमांस सेवनाबद्दलचे वक्तव्य असे विविध दाखले देत, अमित शाहांनी मला हिंदुत्व शिकवण्याची गरज नाही, हिम्मत असेल तर त्यांनी रिजूजी यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करावी, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला आहे.





गोदातीर समाचार

**पाहिजेत**

'दै. गोदातीर समाचार'साठी खालील पूर्णवेळ/अर्धवेळ पदे भरणे आहेत. इच्छुकांनी संपूर्ण माहिती, अनुभव/बायोडाटासह खालील ई-मेलवर किंवा पत्त्यावर अर्ज करावा. संगणकाचे ज्ञान असणाऱ्या, अनुभवी उमेदवारांना प्राधान्य. नवीन उमेदवारही अर्ज करू शकतात.

| | |
|---|---|
| उपसंपादक | ०१ |
| शहर प्रतिनिधी | ०१ |
| जाहिरात व्यवस्थापक | ०१ |
| डीटीपी ऑपरेटर | ०१ |

:: संपर्क ::
संपादक- दै. गोदातीर समाचार
शिवाजीनगर, नांदेड
Email ID : keshavgpatil@gmail.com


## नांदेड ते टनकपुर, उत्तराखंडसाठी नवीन रेल्वे

### डॉ. विजय सतबीरसिंघ यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** अलीकडेच, रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंघ बिट्टू यांच्या दिल्ली येथील कार्यालयात झालेल्या बैठकीत, रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष सतीश कुमार, पर्यावरण आणि केंद्रीय मंत्री मनजिंदर सिंघ सिरसा, राज्यसभेचे माजी सदस्य आणि अल्पसंख्याक समितीचे माजी अध्यक्ष त्रिलोचन सिंघ यांच्यासमवेत श्री गुरुगोविंद सिंघजी महाराज यांचे पवित्र स्थान नांदेडला देशाच्या विविध भागांशी जोडण्याच्या उद्देशाने नांदेड ते टनकपूर उत्तराखंड अशी एक नवीन साप्ताहिक रेल्वे सुरू करण्यात आली आहे, अशी माहिती गुरूद्वारा बोर्डाचे अध्यक्ष डॉ. विजय सतबीरसिंघ यांनी दिली.



ही गाडी क्र. १७६३१ दर रविवारी रात्री ११:४० वाजता नांदेड रेल्वे स्टेशनवरून निघेल व पूर्णा जंक्शन, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला जंक्शन, मलकापूर, खंडवा जंक्शन, इटारसी जंक्शन, राणी कमलापती, बिना जंक्शन, ललितपूर, झाशी जंक्शन, ग्वाल्हेर जंक्शन, धोलपूर जंक्शन, आगरा कॅन्ट, मथुरा जंक्शन, कासगंज जंक्शन, बदायूं, बरेली जंक्शन, इज्जतनगर, पिलीभीत जंक्शन मार्गे ३० तासांचा प्रवास पूर्ण करून मंगळवारी सकाळी ५:५५ वाजता टनकपूर रेल्वे स्टेशनला पोहोचेल.


त्याचप्रमाणे, परतीच्या प्रवासात, ही गाडी १७६३२ मंगळवारी सकाळी ९ वाजता टनकपूर रेल्वे स्टेशनवरून निघेल आणि परतीच्या मार्गाने बुधवारी सायंकाळी ४:३० वाजता नांदेड येथील श्री हजूर साहिब रेल्वे स्टेशनला पोहोचेल. या गाडीमुळे नांदेड येथील गुरूद्वारा येथे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना मदत होणार ओह.

ही रेल्वे सुरू केल्याने डॉ. विजय सतबीरसिंघ आणि जसवंत सिंघ (बॉबी) यांनी बैठकीत उपस्थित सर्व मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

## महसूल विभागातील सर्व खटले ९० दिवसांत निकाली काढणार

**नागपूर (प्रतिनिधी)–** 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा विधेयक २०२५' गुरुवारी विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आले. या विधेयकामुळे आता महसूल मंत्र्यांकडील अपीलांची सुनावणी राज्यमंत्री आणि सचिवांना घेता येणार आहे. यापुढे महसूल विभागातील सर्व खटले ९० दिवसांत निकाली काढण्यासाठी नियोजन करीत आहेत, अशी माहिती यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.






जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# मानव विरुद्ध वन्यजीव ?


राज्यात वाघ, बिबटे आणि भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांनी नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर संकट निर्माण केले आहे. विधानसभेत उभ्या राहिलेल्या चर्चेत सर्वपक्षीय आमदारांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत सरकारकडून तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांची मागणी केली. हे स्वागतार्ह असले तरी या समस्येची मूळ कारणे समजून घेऊन, वन्यजीवांचे अस्तित्त्व आणि मानवांचे रक्षण यांच्यात संतुलन राखण्यासाठी सुसंगत धोरणांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. वन्य प्राणी वस्त्यांत का येतात? याचाही विचार केला जाणे गरजेचे आहे. जंगलात शाकाहारी प्राण्यांसाठी फळे उरलेली नाहीत. जंगलातील अन्नसाखळी विस्कळीत झाल्यानंतर शाकाहारी प्राणी गावांची वाट धरतात, आणि त्यांच्या मागावर असलेले वाघ-बिबटे देखील मानवी वस्त्यांत शिरतात. जंगलाचा परिसर मानवी अतिक्रमण, झपाट्याने होणारा शहरी विस्तार, अवैध वृक्षतोड आणि पाण्याची टंचाई यांमुळे मूळ स्वरूप गमावत आहे. यातून 'मानव विरुद्ध वन्यजीव' हा संघर्ष अधिकाधिक तीव्र होत आहे. वनमंत्र्यांनी जंगलाच्या मुख्य भागात फळझाडे लावण्याची घोषणा केली आहे. हा पाऊल निश्चितच योग्य दिशेने आहे. शाकाहारी प्राण्यांना जंगलातील नैसर्गिक आहार मिळाला तर ते वस्त्यांकडे वळणार नाहीत आणि त्यामुळे वाघ-बिबट्यांची हालचालही जंगलापुरती मर्यादित राहू शकते. मात्र, अशा उपक्रमांसोबत नियमित देखरेख, पाणवठ्यांचे संवर्धन आणि जंगलातील जैवविविधतेचे पुनरुज्जीवन यांनाही तितक्याच ताकदीने पुढे नेण्याची आवश्यकता आहे. वन्य प्राण्यांसाठी भोजनाची पुरेशी तरतूद करणे हा मूलभूत उपाय आहे. सरकारने मांसाहारी प्राण्यांसाठी जंगलात बकऱ्या सोडण्याचा विचार मांडला आहे. हेतू योग्य असला तरी दीर्घकालीन दृष्टीने हा उपाय किती परिणामकारक ठरेल यावर प्रश्नचिन्ह उभे राहते. बकऱ्या हे जंगलाच्या परिसंस्थेशी नैसर्गिकरित्या जोडलेले प्राणी नाहीत. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून तात्पुरते खाद्य उपलब्ध झाले तरी परिसंस्था संतुलन बिघडण्याची शक्यता आहे. वन्य प्राण्यांच्या आहारासाठी स्थिर आणि नैसर्गिक स्रोत उपलब्ध होणे हे कोणत्याही सुजाण वनव्यवस्थापनाचे मूलभूत तत्त्व आहे. सरकारने या दिशेने व्यापक वनसंवर्धन कार्यक्रम आणि वैज्ञानिक तज्ज्ञांचा सल्ला घेऊन निर्णय घ्यावेत. पण असे करताना मानवांचे संरक्षण देखील तितकेच महत्त्वाचे आहे हे विसरता येणार नाही. वन्य प्राण्यांच्या सुरक्षिततेइतकेच महत्वाचे आहे ते मानवांचे रक्षण. फक्त हल्ल्यांनंतर भरपाई देणे किंवा बंदूक परवाने नुतनीकरण करणे हा या समस्येचा दीर्घकालीन उपाय होऊ शकत नाही. ग्रामीण भागात विशेषत: साखर कारखान्यांच्या परिसरातील उसाच्या घनीभूत शेतीत बिबटे लपून बसतात आणि अचानक हल्ले करतात. स्थानिक पातळीवर सतत गस्त पथके, अलर्ट सिस्टीम, उपकरणे आणि प्रशिक्षण यांचा मजबूत पायाभूत ढाचा उभारणे आवश्यक आहे. शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट ही देखील मोठी समस्या बनली आहे. विधानसभेत मुंबईतील आमदारांनी सांगितल्याप्रमाणे, एक लाखाहून अधिक भटकी कुत्री आणि फक्त आठ निवारा केंद्रे हा निश्चितच संतुलन बिघडवणारा आकडा आहे. निर्बंध, नसबंदी, निवारा केंद्रे वाढवणे आणि जनजागृती, या सर्व गोष्टींची सांगड घातल्याशिवाय ही समस्या सुटणार नाही. या समस्येचे स्वरूप केवळ प्रशासनिक नाही, तर सामाजिक, पर्यावरणीय आणि वैज्ञानिक अशा तिन्ही क्षेत्रांचे मिश्रण आहे. त्यामुळे तातडीच्या बैठका, निधी आणि चर्चा याबरोबरच दीर्घकालीन संवर्धनवादी दृष्टिकोन आवश्यक आहे. जसे जंगलातील अन्नसाखळी मजबूत करणे, वनक्षेत्रांचे अतिक्रमण थांबवणे, वैज्ञानिक पद्धतीने वन्यजीवांचे पुनर्वसन करणे आणि ग्रामीण-शहरी भागात सुरक्षितता यंत्रणा बळकट करणे. हे सर्व शासन, प्रशासन आणि समाज यांच्या संयुक्त प्रयत्नातूनच साध्य होऊ शकतात. वन्य प्राण्यांचे संरक्षण आणि मानवांची सुरक्षितता या दोन्ही गोष्टी वेगळ्या नव्हेत, त्या एकमेकांत गुंफलेल्या आहेत. वन्यजीवांच्या जगण्याची हमी दिल्याशिवाय मानवांचे अस्तित्वही सुरक्षित राहणार नाही. त्यामुळे विधानसभेत उभे राहिलेले प्रश्न केवळ हल्ल्यांचे आकडे नसून, पर्यावरणीय संतुलन बिघडल्याची गंभीर चेतावणी आहेत. शासनाने केलेल्या घोषणांचे स्वागत, पण आता गरज आहे ती कार्यक्षम अंमलबजावणीची. तसेच जंगल आणि वस्तीत दोन्ही ठिकाणी सुरक्षितता निर्माण करणाऱ्या ठोस आणि टिकाऊ उपाययोजनांची. मानव आणि वन्यजीव सहअस्तित्त्वाचा मार्ग शोधला तरच दोघांचे भविष्य सुरक्षित राहील, यात शंका नाही.

# संघर्षयोद्धा-लोकनायक गोपीनाथराव मुंडे

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक राजकारणाच्या पटलावर बोटांवर मोजण्याएवढी राजकारणी धुरंधर आहेत. ज्यांनी आपापल्या हयातीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करून भारताच्या राजकारणात आपली छाप उमटवली. या धुरंधर मंडळींमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वसंतराव नाईक, लेखक-वक्ते प्र. के. अत्रे, प्रमोद महाजन, अटलबिहारी वाजपेयी, हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे, शरदचंद्र पवार, भारताचे विद्यमान लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि याच महानुभावांच्या रांगेतील अगदी सन्मानाने घेतले जाणारे नाव म्हणजे मराठवाड्याचे सुपुत्र स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे! ही सर्वच नावे तिसऱ्या जगातील असून यांना राजकारणाचा कोणताही वसा-वारसा लाभला नसतांना स्वतःच्या कर्तृत्वावर यशाची अनेक शिखरे त्यांनी सर करून आपापल्या काळावर आपला चिरकाल ठसा उमटवला! ही सगळीच मंडळी उपेक्षित-वंचित परिस्थितीतून येऊन मोठी झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संपूर्ण जीवनच संघर्षात गेले. काही काळ संसदेत काम करण्याची संधी मिळाली असता तिथेही उपेक्षेचे चटके सोसावे लागले परिणामी केंद्रीय कायदे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन बाबासाहेब मंत्रिमंडळाबाहेर पडले. जवळपास या सर्वच लोकांच्या जीवनात टोकाचा संघर्ष करण्याची वेळ आली आणि त्यंनी ती मोठ्या ताकदीने पेलून आपले अस्तित्व निर्माण केले. याच प्रकारचा खडतर जीवन-संघर्ष स्व.गोपीनाथराव मुंडे यांच्या वाट्याला आला, परंतु मुंडे यांनी जीवनभर कुठेही न झुकता आपला संघर्ष करत राहिले आणि इतिहासाच्या पानावर त्यांचा अजोड संघर्ष अजरामर राहिला!

मराठवाड्याच्या मागास बीड जिल्हातील उसतोड कामगारांच्या डोंगरपट्ट्यातल्या परळी तालुक्यातील नाथ्रा गावात स्वातंत्र्याच्या पहिल्या दशकांत जन्मलेले गोपीनाथ मुंडे म्हणजे संघर्षाचे दुसरे नाव! परळी तालुक्यातील नाथ्रा गावापासून ते युनोमध्ये भारताचे प्रतिनिधित्व आणि भारतीय संसदेत केंद्रीय मंत्रिपदांपर्यंतचा प्रवास काही एवढा सहज आणि एका ओळीत लिहिण्यासारखा नक्कीच नाही! अंबाजोगाईच्या महाविद्यालयातून सुरु झालेला गोपीनाथराव मुंडे यांचा प्रवास सर्वांनाच थक्क करणारा आहे. स्व.प्रमोद महाजन यांच्यासोबतची मैत्री मुंडे यांच्या जीवनात एवढी अमुलाग्र क्रांती आणेल याची कुणाला तिळभरसुद्धा कल्पना नव्हती. महाजन-मुंडे या महाविद्यालयीन स्तरावरील जोडीचे रुपांतर घट्ट मैत्रीत झाले. घरचे वारकरी संस्कार मुंडे यांना जीवनभर कामाला आले. वडील पांडुरंगराव मुंडे हे लहानग्या गोपीनाथला कीर्तन-भजनाला घेऊन जायचे. दुर्दैवाने वयाच्या विसाव्या वर्षी वडिलांचे निधन झाले आणि पुढील शिक्षणाची जबाबदारी मोठ्या सक्षमपणे मुंडे यांचे जेष्ठ बंधू पंडितअण्णांनी उत्तमपणे पेलली. गोपीनाथरावांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. अण्णांनी गावाकडील शेतीबाडी सांभाळून गोपीनाथराव मुंडे यांचे शिक्षण बंद पडू दिले नाही. दुसरीकडे गोपीनाथराव पुणे येथे जनसंघाच्या चळवळीने झपाटून गेले. तिथे वसंतराव भागवतांच्या संस्काराने त्यांची देशभक्तीची विचारसरणी दृढ झाली. पुण्यात विद्यार्थी संसदेच्या निवडणुका, नंतर जनसंघ आणि शेवटी भाजपाच्या प्रचारकार्यात

मुंडे-महाजन जोडगोळीने प्रवेश केला. शेठजी-भटजींचा पक्ष असा शिक्का बसलेल्या भाजपला पुणे-मुंबई आणि अन्य शहरातून बाहेर काढून विदर्भ, कोकण, मराठवाडा आदी सर्व भागात नेऊन पोहचवण्याचे मूलगामी कार्य मुंडे-महाजन जोडगोळीने मोठ्या हिमतीने केले. बाहेर प्रचार करतांना गोपीनाथराव मुंडेंचे लक्ष आपल्या परळीवर होतेच. १९७८ च्या बीडच्या जि.प. निवडणुकीत अंबाजोगाईच्या उजनी गटातून ते बीड जिल्हापरिषदेवर निवडून आले आणि त्यांनी पुन्हा मागे वळून पाहिलेच नाही!



१९८० मध्ये निवडणुका लागल्या आणि तिशीतील गोपीनाथराव मुंडेंनी परळी मतदार संघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली सुद्धा! पहिल्यांदाच मराठवाड्यातून आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून भाजपच्या नावाखाली निवडून येण्याचा सन्मान गोपीनाथराव मुंडेंना मिळाला. त्यानंतर एकावर एक संधी त्यांना मिळत राहिल्या आणि त्यांनी त्या सर्वच संधींचे सोने केले. पुढे भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष, भाजपचे प्रदेशाध्यक्ष अशा एक ना अनेक संधी त्यांच्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळाल्या. या पदांचा फायदा मुंडे यांनी आपल्या पक्षाला मोठ्याप्रमाणात करून दिला. श्रीमंत आणि उच्चभ्रू लोकांमध्ये असलेला शेटजी-भटजींच्या भाजपची पाळेमुळे बहुजन समाजाच्या मनामनात खोलवर रुजविण्याचे श्रेय मुंडे-महाजन जोडगोळीला जाते! गोपीनाथराव मुंडे यांनी राजकारणात अनेक दैवी वरदान असल्यासारखे महान कार्य करून दाखवले. भाजप पक्षांत अठरापगड जातींच्या लोकांच्या चुंबकासारखे खेचण्याचे काम मुंडेच्या व्यक्तिमत्व आणि कर्तृत्वाने केले. बहुजन समाजासाठी राजकारणात असलेला अवकाश मोठ्या शिताफीने मुंडे यांनी भरून काढला. साळी-माळी-धनगर-बंजारा-वंजारी-मुसलमान सारखी उपेक्षित वंचित जाती-धर्माच्या लोकांना देशाच्या मुख्य राजकीय प्रवाहात खेचून आणण्याचे महान कार्य गोपीनाथराव मुंडे यांनी केले! एवढेच काय उपेक्षित आणि दुर्लक्षित मराठा समाजाच्या नव्यानेतृत्वाला भाजपमध्ये संधी देऊन सर्व जातींची एक मजबूत मोठ बांधण्याचे कार्य मुंडे यांनी केले.

एकानंतर एक पदांवर काम करतांना १९९२ ते १९९५ काळात गोपीनाथरावांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्षनेता म्हणून काम केले. इथेच मुंडे यांची उरलीसुरली ओळख महाराष्ट्राच्या तमाम जनतेला झाली. थोड्याच काळात गोपीनाथराव हे भाजप आणि उपेक्षितांचा चेहरा बनले. या सगळ्या गोष्टी जुळून आणण्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले, रात्रंदिवस प्रवास, गावोगाव-खेड्यापाड्यातील सामान्य माणसांच्या भेटीगाठी घेऊन जनसामान्य लोकांमध्ये आत्मविश्वास जागृत केला. लाखोंच्या सभा जिंकण्याचे कसब, खडा आवाज, भारदस्त व्यक्तिमत्व, ग्रामीण आणि शहरी लोकांची नाडी पकडून-लोकांचा प्रतिसाद घेऊन बोलण्याची संभाषण कलेच्या देणगीने गोपीनाथरावांनी संपूर्ण महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली. एक दशकांच्या कामात मुंडे महाराष्ट्रातील ओबीसी आणि वंचित-शोषितांचा चेहरा झाले. त्यांनी १९९४ साली संघर्ष यात्रा काढून राजकारणातील गुन्हेगारीकरण, भ्रष्टाचार, जळगावचे सेक्स स्कॅंडल यातून मुंडे यांनी महाराष्ट्रभर रान उठवले. तत्कालीन सरकारवर विधानसभेत आणि विधानसभेबाहेर घणाघाती हल्ले करून सरकारमधील मंत्र्यांना नामोहरम केले. महाराष्ट्राच्या राजकारणात मुंडे नावाचे नवे वादळ घोंगावत होते आणि त्या वादळात भल्याभल्यांचे राजकीय मनसुबे धुळीला मिळाले!

याचा कळस म्हणजे मुंडे दोनवेळा बीड मतदार संघातून लोकसभेवर निवडून गेले. लोकनेते गोपीनाथराव आणि महाराष्ट्राच्या सुदैवाने केंद्रात भाजपचे बहुमत आले आणि नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात गोपीनाथरावांना केंद्रीय ग्रामविकासमंत्री हे कॅबिनेट मंत्रिपद मिळाले! दुर्दैवाने हा आनंद जास्त काळ टिकू शकला नाही आणि ३ जून रोजी गोपीनाथराव मुंडे यांचे अपघातात निधन झाले! महाराष्ट्राच्या राजकारणात फार मोठी पोकळी निर्माण झाली. राजकारणाच्या आणि जात-धर्म या पलीकडे आपली ओळख निर्माण करणारा असा लोकनेता पुन्हा होणे नाही. विद्यमान काळात राजकारणाने कूस बदलली असून अनेक नवनवीन समीकरणे समोर येतांना मतदार गोंधळून गेला आहे. शरदचंद्र पवार आणि नितीन गडकरी या एक-दोन नेत्यांशिवाय सर्वच महाराष्ट्राचे भले करणारे सर्वसमावेशक मुंडे यांसारखे नवे नेतृत्व उभे राहणे गरजेचे आहे. राजकारणातील कट्टरतेचे निर्मुलन करून लोकांची कामे करणाऱ्या लोकनेत्याची नितांत गरज आज महाराष्ट्राला आहे. आजही सामान्य आणि सर्वच लोक 'आज गोपीनाथराव मुंडे असते तर असे झाले नसते' असे भावनिक उद्गार काढतांना एकूण मन व्यथित होते! चला पुन्हा एखादे गोपीनाथराव मुंडे उदयास येतील अशी प्रतीक्षा करून स्व. गोपीनाथराव मुंडे यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन करूयात!

जय हिंद! जय भारत!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८
(टीप: लेखक हे व्याख्याता, कवी, किर्तनकार, समीक्षक, योग-प्राणायाम प्रशिक्षक आहेत.)

# घटस्फोटाची प्रकरणं : एक चिंतेची बाब



लिव्ह इन रिलेशनशीप हा कायदा विवाह न करणाऱ्या लोकांसाठी असावा. विवाहानंतरच्या लोकांसाठी नको. तसा कायद्यात बदल व्हावा. अलीकडील वास्तविक परिस्थिती पाहता न्यायालयात घटस्फोटाची दाखल होणारी प्रकरणं जास्त आहेत व ती वाढतच आहेत. ही वाढत आहेत लिव्ह इन रिलेशनशीपच्या सरकारच्या कायद्यामुळे. तसं पाहता न्यायालयानंही इतर देशाप्रमाणे याही देशात लोकांना लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहण्याची मुभा दिलेली आहे. तसं लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये देशात कोणत्याही वयातील स्री व पुरुषांना राहता येतं. त्यातच अशा लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये लोकं आपले आपले विवाहाचे पती वा पत्नीच सोडून नाही तर चांगला रमलेला संसार सोडून राहतात. परंतु यानं संसार उद्ध्वस्त होतो.

विवाहाला फाटा फुटतो व संस्काराचा मृत्यू होतो. तसं पाहता बऱ्याच समस्या निर्माण होतात. यावर उपाय म्हणजे न्यायालयानं अशा कायद्याला मंजुरी द्यावी की विवाहाला फाटा फुटणार नाही. विवाह संस्कार तुटणार नाही. संस्काराचा मृत्यू होणार नाही. कारण विवाह ही अशी गोष्ट वा बंधन आहे की त्याचे धागे मजबूत नसतात. विवाह हा काचेसारखाच असतो. जी काच जशी क्षणीक धक्क्यानं तुटते. तसाच विवाहही तुटतो. याला जबाबदार जरी इतर गोष्टी असल्या तरी एक महत्वाचं कारण आहे लिव्ह इन रिलेशनशीप. म्हणूनच याचे गंभीर परिणाम लक्षात घेता सरकारनं देशातील सर्वांसाठी एकच कायदा बनवावा. देशातील अविवाहित तरुणांसाठी लिव्ह इन रिलेशनशीप असावं. विवाहित लोकांसाठी नाही. जेणेकरून विवाह झाल्यानंतरही आज जे लोकं लिव्ह इन रिलेशनशीप अंतर्गत पती पत्नीसोबत न राहता दुसऱ्याच परकीय माणसांसोबत मजेनं राहतात. प्रसंगी असे राहून आपल्याच जोडीदारांकडून खावटीही वसूल करतात. ही चिंतेची व गंभीर बाब आहे. असे राहतात, तेही घटस्फोट न घेता. त्यातूनच खून, बलात्कार, अपहरण, बदला यासारखी गुन्हे-गारी घडत असते. हे जर बंद करायचे असेल तर लिव्ह इन रिलेशनशीप हा कायदा विवाहपूर्व लोकांसाठी असावा. विवाहानंतरच्या लोकांसाठी नकोच.

लिव्ह इन रिलेशनशीप हे पती पत्नीच्या भांडणाचं तेही कारण महत्वाचं आहे. असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. कारण अलिकडील काळात पती पत्नीमध्ये नेहमी भांडणं होत असतात. ती भांडणं एवढी मोठी होतात की त्यातून कधीकधी खूनही होत असतात. असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. सध्याचा काळ हा सुशिक्षित लोकांचा काळ आहे. मुलंच नाही तर मुलीही आज शिकायला लागल्या आहेत. परंतु तसं पाहिल्यास लोकं जरा जास्तच सुशिक्षित झालेत. त्या मानानं मेंदू तेवढा सुशिक्षित झाला नाही. तशीच शिक्षणाची टक्केवारी पाहिली तर मुली जास्त प्रमाणात शिकताना दिसत आहेत. त्यामानानं मुलं कमी. त्यातच मुली ह्या उच्चतम टक्केवारी मिळवतात तर मुलं ह्या कमी. हा झाला शिक्षणाचा विषय. पुढं कामाचीही गती पाहिली असता मुली ह्या जास्त काम करताना आढळतात. काही मेहनतीचीही कामं करताना दिसतात. जसे बाहेर काम करून आल्यावर घरातील स्वयंपाकाचीही कामं मुली करीत असतात. परंतु मुलं फक्त बाहेरची कामं करतात. घरची कामं करीत नाही. याचाच अर्थ स्वयंपाकाची कामं करीत नाहीत. तसा दर्जाच्या बाबींचा विचार केल्यास पुरुषांच्या बरोबरीने स्रियाही अंतराळात गेलेल्या आहेत. परंतु हे जरी खरे असलं तरी जास्त ताकदीची कामं स्रिया करीत नाहीत. मात्र ती आपल्या मेंदूच्या ताकदीनं मोठमोठी कामंही पार पाडत असतात. ताकदीची कामं....होय. महिला ताकदीची कामं करीत असतात. परंतु ती कामं करीत असताना त्या कुणाची तरी मदत घेत असतात. अशातच समजा त्यांना पतीनं पाहिलं तर त्या पतीच्या मनात शंका निर्माण होत असतात. पूर्वीही तसंच असायचं. त्यामुळं पूर्वी स्रियांना कोणताही पती कामाला जावू देत नसे. यातूनच ना स्रियांचे कामाला जाणे, ना तिला ताकदीची कामं करावी लागणे, ना तिनं कोणी पुरुष मदतनीस पकडणे, ना तिचं वागणं पाहून कोणत्याही पतीच्या मनात शंका निर्माण होणे. या गोष्टी घडत असतात.

अलीकडील काळात तर लोकांच्या वागण्याचं चित्रच बदललं आहे. कालपर्यंत जी स्री कमऱ्याच्या चार भिंतीत बंदिस्त होती ती आता बाहेर निघाली आहे. तिला पती असतांना ती परपुरुषांसोबत फिरू लागली आहे. त्यातच ती व्यभिचारही करू लागली आहे. परपुरुषांसोबत. हे वास्तववादी चित्रण आज सर्वत्र दिसायला लागलं आहे. यात पुरुषही काही मागं नाहीत. पुरुषही आपली एक पत्नी असताना परस्रीसोबत फिरू लागला आहे. त्यातच तो व्यभिचारही करू लागला आहे. अन् हे जेव्हा जोडीदाराला दिसतं तेव्हा भांडणं होतात व तद्नंतर लिव्ह इन रिलेशनशीपचा वापर होतो. परंतु त्यामुळं चांगल्या संसारात वितुष्ट येतं. आज अशाच स्वरुपाचं स्री आणि पुरुष असलेल्या पती पत्नीचं वागणं एकमेकांना दिसत असल्यानं घटस्फोटाचं एक कारण म्हणून तेच कारण पुढं येत आहे.

वरील परिणाम पाहता याच प्रकारातून खूनही आज होत चाललेले आहेत. याबाबतीत एक प्रसंग असा घडला होता की, त्या प्रसंगात एका पत्नीनं आपल्या प्रियकराला रात्री एक वाजता आपल्या पतीला गाढ झोपेत असताना बोलावले व आपल्या पतीची हत्या करण्याचा प्रयत्न केला होता. कारण तिला तो प्रियकर आवडत होता व ती त्याचेसोबतच राहणार होती. परंतु कधीकधी तिला मुलं असल्यानं मजबुरीनं पतीकडं येत होती व पतीही तिला राहू देत होता. यात महत्वपूर्ण गोष्ट ही की, कधी अशा परलोकांच्या विवाहबाह्य संबंधात पडून कधी पत्नी आपल्या पतीची हत्या करते तर कधी पती आपल्या पत्नीचीही हत्या करतो. तसंच आज असे विवाहबाह्य संबंध वाढत चाललेले आहेत. याचं कारण आहे आजचं पाश्चात्यीकरण. आज लोकं पाश्चात्य लोकांचं अनुकरण करुन विवाहबाह्य संबंध ठेवत आहेत. ते विवाहबाह्य संबंध ठेवू शकतात. कारण तेथील वातावरण विवाहबाह्य संबंध ठेवण्यास लाभदायक आहे. तसं येथील वातावरण नाही. ती आपली संस्कृतीही नाही. ही आपली भारतीय संस्कृती आहे व आपली भारतीय संस्कृती एक महान संस्कृती आहे. परंतु आपल्या अशाच प्रकारच्या विवाहबाह्य संबंधानं आपल्या देशात पतीपत्नींमध्ये शंका-कुशंका शिरतात. ज्या शंका-कुशंका मानवी मनाला घातक असतात व त्यातूनच पुढे वेगवेगळ्या समस्या वाढीस लागतात. कुठे घातपातही होतो.

अलीकडे याच विवाहबाह्य संबंधातून न्यायालयात घटस्फोटाचे खटले दाखल होत आहेत. त्यांचे प्रमाण जास्तच आहे. तसं पाहता ही देशाची एक गंभीर समस्या बनलेली आहे. यात निर्दोष असलेले पती वा पत्नी पिसले जातात. तसं पाहता यात वयाचं बंधन नसतं. नेमक्या वयात विवाहबाह्य संबंध निर्माण होतील असं काहीच नसतं. त्यातच वय वर्षे चौदा पूर्ण झाले की आजच्या काळात विवाहबाह्य संबंध निर्माण होतात. जरी त्यांचं वय झालं नसलं तरी. तसेच कोणाचे विवाहबाह्य संबंध हे विवाहानंतर निर्माण होतात. यातच सरकारनं एक कायदा आणला आहे लिव्ह इन रिलेशनशीप. व्यक्ती विवाह न करता आपल्या विवाहाच्या व्यक्तीला सोडून कोणत्याही व्यक्तीसोबत कधीही अन् केव्हाही दीर्घकाळ सहवास करु शकतो. राहू शकतो. याचाच अर्थ असा की, विवाहानंतरही व्यक्तीचं त्याच्या जोडीदाराबरोबर पटत नसल्यास तो त्या जोडीदाराला सोडून आपल्या प्रियकरासोबत दीर्घकाळ राहू शकतो. यातूनच चांगल्या नात्यात विच्छेद निर्माण होतो व घटस्फोटाचे खटले दाखल होतात. एकीकडे न्यायालयातील लिव्ह इन रिलेशनशीपच्या कायद्यानुसार लोकं घटस्फोटाचे खटले न्यायालयात दाखल करुन लढत असतात व निर्दोष असलेल्या पती वा पत्नीला सतावत असतात तर दुसरीकडे लिव्ह इन रिलेशनशीप अंतर्गत न्यायालयातून सुरक्षा असल्यानं व खुद्द न्यायालयानंच अभय दिलं असल्यानं प्रियकरांसोबत राहात असतात. हे आजचं वास्तविक वर्तमान आहे. यात महत्वपूर्ण गोष्ट ही की, अशा विवाहबाह्य संबंधातून व लिव्ह इन रिलेशनशीप-मधून आज विवाहाचं स्वरूप पालटलं आहे. संस्कृती मोडीत निघाली आहे. याचा परिणाम हा सर्वच गोष्टींवर झालेला आहे. जसा विवाह उशिरा होणे. याच विवाह उशिरा होण्यातून संतती न होणे, वांझपण येणे, कधीकधी विवाह होण्यापूर्वी असे संबंध असल्यास गर्भ राहू नये म्हणून गर्भनिरोधक गोळ्याही घेतल्या जातात. त्यातूनच पुढं त्याचा परिणाम होवून वांझपण येतं.

महत्वपूर्ण गोष्ट ही की, असे विवाहबाह्य संबंध व त्यातून निर्माण झालेल्या समस्या फार मोठ्या आहेत. त्या समस्या अलीकडील काळात वाढतच चालल्या आहेत. त्याचं कारण आहे आज न्यायालयानं लोकांना दिलेले अभय. यात महत्वाचा विचार असा की, आज न्यायालयातील घटस्फोटाची वाढती प्रकरणं पाहता न्यायालयानं लिव्ह इन रिलेशनशीप प्रकरणावर विचार करावा. कायद्यातही तसाच बदल करावा. लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये राहण्याची अशा लोकांना परवानगी द्यावी की जे विवाहित नाहीत वा ज्यांचा कुठंही विवाह झालेला नाही. असं जर न्यायालयानं केलं वा तसा बदल जर कायद्यात झालाच तर कदाचित न्यायालयातील घटस्फोटाची जी प्रकरणं दाखल होत आहेत वा वाढत आहेत. त्याला खंड पडू शकतो वा पाडता येवू शकतो. विशेष सांगायचं म्हणजे न्यायालयातील घटस्फोटाची प्रकरणं कमी व्हायला हवीत. कारण विवाह हा एक संस्कार आहे भारतीयांसाठी. ही बाब न्यायालयानंही लक्षात घ्यायला हवी व तसा बदल कायद्यात करायला हवा. जेणेकरुन विवाहानंतर लिव्ह इन रिलेशनशीप अंतर्गत राहणाऱ्या लोकांवर जरब बसेल व तेव्हाच घटस्फोटाची प्रकरणं आपोआपच कमी होतील किंवा कमी तरी करता येतील यात शंका नाही.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# क्रांतिकारी चळवळीचे प्रणेते कै. नागोराव जाधव

शिक्षणाची गंगा तळागाळातील लोकांच्या दारात पोहचावी म्हणून मोजक्याच मान्यवरांनी तळमळीने प्रयत्न केले. ह्या बोटावर मोजण्या इतक्या मंडळीत जनता शिक्षण प्रसारक मंडळ उमरदरी ता. मुखेड या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. नागोरावजाधव यांचा क्रमांक लागतो.

शिक्षण महर्षी नागोराव जाधव यांचा जन्म १२ डिसेंबर १९३४ रोजी मुखेड तालुक्यातील उमरदरी या गावात एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. १९३४ म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळ होता व त्यावेळी मराठवाड्यावर निजामाचा एकछत्री अंमल होता. नागोराव जाधव यांना पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी त्यांच्या वडिलांनी त्यांना मुखेड येथे गोविंद मास्तर (गुरुजी) यांच्या खाजगी शाळेत दाखल केले. त्याकाळी अनिवार्य असलेली उर्दू भाषा त्यांना उत्तमरीत्या अवगत होती. त्यांचे हायस्कूलचे शिक्षण देगलूर येथील साधना हायस्कूल येथे पूर्ण झाले.

१९५२ साली ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले. १९४९ ते १९५१ च्या दरम्यान आर्य वस्तीगृह देगलूर, १९५१ ते १९५२ मराठा वसतिगृह नांदेड व १९५२ ते १९५६ च्या दरम्यान पीपल्स कॉलेज, नांदेडच्या वसतिगृहात राहून त्यांनी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. १९५६ साली इंग्रजी व इतिहास विषयाची आवड असल्यामुळे इंग्रजी वाड्मय (इंग्लिश लिट्रेचर) घेऊन त्यांनी पीपल्स कॉलेज नांदेड येथून बी. ए. ची पदवी प्राप्त केली.



इंग्रजी वाड्.मयाचा एक जिज्ञासू विद्यार्थी म्हणून सर्व प्राध्यापकवृंदाचे त्यांच्याकडे विशेष लक्ष असायचे. विद्यार्थी जीवनापासून कोणत्याही विषयावर असलेल्या वक्तृत्व स्पर्धेत ते हिरीरीने भाग घेत असत. स्वत:च्या शैलीदार व आवेशपूर्ण वक्तृत्त्व गुणांमुळे ते सर्वपरिचित झाले व यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत गेली.

१९५७ - ५८ साली शासकीय बी. एड.कॉलेज, औरंगाबाद येथून त्यांनी बी. एड. ची पदवी प्राप्त केली. बी. ए., बी. एड. झाल्यानंतर शाळा व वसतिगृहे सुरू करावीत असा विचार त्यांच्या मनात होता, पण आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने दोन वर्षात तीन ठिकाणी म्हणजे १९५४ ते १९५९ च्या दरम्यान शारदा भवन हायस्कूल नांदेड येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून व जनता हायस्कूल नायगाव बाजार या शाळेचे पहिले मुख्याध्यापक म्हणून व मिलिंद विद्यालय, कुंडलवाडी या शाळेत मुख्याध्यापक म्हणून इतरांकडे नोकरी केली, पण नोकरी करताना केवळ आपलाच उद्धार होईल. आपले कुटुंब तेवढे सुखी होईल, पण इतरांचे काय? या भावनेने आपल्या सभोवतालच्या खेड्यातील अज्ञानी व गरीब असलेल्या लोकांना शिक्षण देण्यासाठी १९५९ साली मुखेड तालुक्यातील उमरदरी येथे जनता शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून जून १९६० मध्ये उमरदरी येथे नरसिंह विद्यामंदिर सुरू केले. त्याकाळी विद्यार्थ्यांना अतिशय दूर-दुरून चालत यावे लागत असे. विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन शिक्षण घेण्यासाठी आणि राहण्याची सोय एकाच ठिकाणी व्हावी या उद्देशाने त्यांनी दुसऱ्याच वर्षी कॉस्मॉपोलेटीन हॉस्टेलची सुरूवात केली.

तसेच १९६९ साली मुखेड तालुक्यातील चांडोळा सर्कलमधून जि. प. निवडणूक लढवून सदस्य म्हणून ते निवडून आले. नांदेड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे ते काही काळ सदस्य सुध्दा होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सेक्रेटरी म्हणून सुद्धा काही काळ त्यांनी कार्य केले.त्यांनी 'आघात' नावाचे साप्ताहिक सुरू केले.

पुढे राजकारणात ते फारसे रमले नाहीत, पण शैक्षणिक चळवळीपासून मात्र ते दूर गेले नव्हते. मात्र कालांतराने ते राजकीय क्षेत्र सोडून पुन्हा शिक्षण क्षेत्रातच त्यांनी झेप घेतली. कार्ल मार्क्स, लेनीन, एंगेल्स, शेक्सपिअर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा व विचारांचा त्यांच्यावर मोठा पगडा होता. शेतकऱ्यांचे व कष्टकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता व न्याय्य मागण्यांकरिता अनेक लोकचळवळी त्यांनी उभ्या केल्या. त्यांनी कोणत्याही राजकीय पुढाऱ्याची उभ्या आयुष्यात कधीही हांजी-हांजी व लाचारी पत्करली नाही. स्वकर्तृत्वावर ते मोठे झाले.

महाराष्ट्र सांस्कृतिक मंडळाचे माजी अध्यक्ष तथा पीपल्स कॉलेजचे पहिले प्राचार्य डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांनी त्यांच्या 'ओंजळभर पाणी' या आत्मचरित्रात नागोराव जाधव यांचा उल्लेख 'माझा सर्वात लाडका विद्यार्थी' असा केला आहे. आयुष्यामध्ये मानपानाचा विचार न करणाऱ्या व शिक्षण क्षेत्रात अहोरात्र काम करून नावलौकिक मिळविणाऱ्या या थोर शिक्षणतज्ज्ञास जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**-बालाजी बापूराव पाटोळे**
सिडको, नांदेड

## थोडक्यात...

### कामठा ग्रामपंचायतीच्या वतीने जनजागृती रॅली

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील कामठा (बु.) ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील जिल्हा परिषद शाळा, श्री बसवेश्वर माध्यमिक विद्यालय या विद्यार्थ्यांची स्वच्छता रॅली गावातून मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली.

ग्रामस्थांसाठी सुवर्णसंधी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत थकबाकी भरा ५०% टक्के पर्यंत सवलत मिळवा. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर थकबाकीदार ग्रामस्थांना एक मोठी सुवर्णसंधी आहे. त्यासाठी नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय कामठा (बु.) येथे संपर्क साधावा.

यावेळी सरपंच प्रतिनिधी विश्वनाथ दासे, उपसरपंच राजू निकम, हाजुसिंग कामठेकर, महंतअप्पा बरगळ, शंकर कंगारे, माजी सरपंच शिवलिंग स्वामी,चंदबशी दासे, ग्रामसेवक डी. बी. आगलावे आदींसह श्री बसवेश्वर हायस्कूल, जि प. शाळेतील शिक्षकवृंद व विद्यार्थी तसेच अंगणवाडी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरडीसी आंबेकर यांच्या आश्वासनानंतर जनवादी महिला पदाधिकाऱ्यांनी उपोषण सोडले

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील अनुदानापासून वंचित राहिलेल्या पूरग्रस्तांच्या प्रलंबीत मागण्यांसाठी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या जिल्हाध्यक्षा तथा राज्य सचिव मंडळ सदस्या कॉ. लता गायकवाड आणि कॉ. प्रेमला पतंगे यांनी दि. ९ डिसेंबर रोजी मनपा, तहसील आणि जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करून आमरण उपोषणाची सुरवात केली होती.

उर्वरित पूरग्रस्तांचे पंचनामे महापालिकेने तत्काळ तहसील कार्यालयास पाठवावेत व सानुग्रह अनुदान पीडित पूरग्रस्तांना देण्यात यावे ही प्रमुख मागणी उपोषणकर्त्यांनी केली होती. या मागणीचा पाठपुरावा केला आहे.

# हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर उत्सवास नागपूरहून सुरूवात

## डॉ. विजय सतबीरसिंघ यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री गुरू तेग बहादूर साहिब महाराज यांच्या ३५० व्या शहीदीला समर्पित भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली, हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर नावाचा शहीदी शताब्दी उत्सव साजरा केला जात आहे.

या कार्यक्रमाची सुरुवात ७ डिसेंबर रोजी नागपूर येथून झाली. हा कार्यक्रम उत्तमरित्या सुरू करून यशस्वी व्यवस्थापनाबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. विजय सतबीर सिंघ यांचा विशेष सन्मान केला. यावेळी श्री गुरु ग्रंथ साहिब महाराज यांचा प्रकाश असून गुरबानी कीर्तन व गुरुमत विचारांची चर्चा पूर्ण भक्तिभावाने करण्यात आली.



यावेळी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, राज्यमंत्री माधुरी मिसाल, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अल्पसंख्याक मंत्री माणिकराव कोकाटे, नियोजन मंत्री आशिष जैस्वाल, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, रामेश्वर नाईक, हिंद दी चादर श्री गुरु तेग बहाद्दर समागम, संत बाबा हरनाम सिंघ, जत्थेदार दमदमी टकसाल, संत बाबा बलविंदर सिंघ, कार सेवावाले, लंगर साहिब, मुख्य प्रशासक साहेबांचे सल्लागार जसवंत सिंघ बॉबी, भाई सुखविंदर सिंघ कथावाचक, नागपूरचे जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांच्यासह महाराष्ट्र शासनाचे मान्यवर व मंत्री उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंघ यांच्या आदेशानुसार गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या एका विशेष पथकाने सहभाग घेतला.

# संविधान निर्मात्यांनी भारतीय नागरिकांना मूलभूत अधिकारांची मौल्यवान देणगी दिली –प्राचार्य डॉ. सुभाष गवई

**किनवट (प्रतिनिधी)–** संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय नागरिकांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ नुसार मूलभूत अधिकारांची अत्यंत मौल्यवान देणगी दिली आहे. त्यानुसार सर्व समान आहेत. सर्वांना समतेचा अधिकार आहे. सर्वांना एकसारखा कायदा लागू आहे, असे प्रतिपादन विदर्भ महारोगी सेवामंडळ, तपोवन अमरावतीचे अध्यक्ष कुष्ठ सेवाकर्मी, संविधानाचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी केले.



गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात मंगळवार, दि. ९ डिसेंबर रोजी भारतीय संविधानातून मानवी हक्काचा जाहीरनामा या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. भारतीय संविधानाच्या निर्मितीस ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल घरघर संविधान हा उपक्रम दि. २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ पर्यंत प्रत्येक शाळेत, गावात राबवून संविधानाबद्दल जनजागृती, प्रभातफेरी, विविध स्पर्धा तसेच व्याख्यानांचे आयोजन करावे, या शासननिर्णयानुसार वरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यात्प्रसंगी मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभि. प्रशांत ठमके अध्यक्षस्थानी होते. गटशिक्षणधिकारी अनिलकुमार महामुने, केंद्रप्रमुख उत्तम कानिंदे, ॲड. विक्रांत गवई, संस्थेच्या कोषाध्यक्षा प्राचार्या शुभांगी ठमके व डॉ. मोना गवई यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. गवई म्हणाले की, मानवी हक्काची सनद संयुक्त राष्ट्र संघाने १९४८ मध्ये स्वीकारली. पण १९४९ ला राजकीय लोकशाही मिळाली. डॉ. बाबासाहेबांनी १९४६ पासूनच तथागत बुद्धांच्या विचारातून ही लोकशाही आणली. ती इतर देशातून घेतली नाही. संविधानात लिंगभेदाला थारा नाही. परंतु आजही मुलीं-मुलांमध्ये फरक केला जातो. मुलींना, महिलांना शिक्षणाची मुभा दिली, परंतु त्यांना स्वतंत्र विचार करण्याचे स्वातंत्र्य दिले नाही. भगवान बुद्ध, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री स्वातंत्र्याचा विचार दिला होता. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. समाज व्यवस्थेला बदलण्याची ताकद शिक्षकांमध्ये आहे. म्हणून सर्वांनी प्रगल्भ व्हावे. शुभांगी बेद्रे या विद्यार्थिनीने प्रास्ताविक केले. पर्यवेक्षक संतोष बैस ठाकूर यांनी सूत्रसंचालन केले. उपप्राचार्य राधेश्याम जाधव यांनी आभार मानले. प्रारंभी फर्स्ट ऑफिसर डी.एस. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली एन. सी. सी. ५२ महाराष्ट्र बटालियनच्या पथकाने पाहुण्यांना मानवंदना दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य प्रमोद मुनेश्वर, उपमुख्याध्यापक किशोर डांगे, पर्यवेक्षक रघुनाथ इंगळे, मनोज भोयर, मुकूंद मुनेश्वर यांच्यासह सर्व शिक्षक , शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. संविधान उद्देशिका सामूहिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ग्रामंपचायत अधिकारी मुख्यालयी राहत नसल्याने ग्रामस्थांची कामे खोळंबली

## हिवाळी अधिवेशनात देगलूर, बिलोली विधानसभेचे आमदार प्रश्न मांडतील का?; नागरिकांचा सवाल

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** ग्रामसेवक हा गावकरी आणि शासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. गावातील लोकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम ग्रामसेवक करत असतात, परंतु परिसरातील बहुतांश गावात ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत ते तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहत असल्याने ग्रामीण भागातील जनतेची कामे खोळंबली आहेत. नागरिकांना कामे करून घेण्यासाठी दिवसेंदिवस वाट पाहावी लागत आहे. हा प्रश्न देगलूर, बिलोलीचे आमदार जितेश अंतापूरकर मतदारसंघाचा प्रश्न हिवाळी अधिवेशनात मांडतील का? असा प्रश्न तालुक्यातील नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.

ग्रामसेवक हे जिल्हा परिषदचे सेवक असतात. गावातील लोकांना आरोग्य, शेती, ग्रामविकास व शिक्षण या बाबतीत सल्ला देणे, ग्रामविकासाच्या वेगवेगळ्या शासकीय योजनांची माहिती देणे, जनतेला विविध प्रकारचे दाखले देणे, बालविवाह प्रतिबंधन करणे, बांधकाम कामगारांची नोंदणी कारणे, ग्रामपंचायतचा प्रत्यक्ष खर्च व काम यांच्या पाहणीसाठी दक्षता समिती नेमणे अशी महत्त्वाची कामे ग्रामसेवक करतात. गावातील ग्रामसेवक मुख्यालयी राहात नाहीत. तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणाहून काम करत असल्याने नागरिकांच्या कामाचा खोळंबा होत आहे. या प्रकारामुळे नागरिक त्रस्त आहेत.

प्रत्येक गावच्या विकासाची जबाबदारी ग्रामसेवकाची असते. तरीही हे अधिकारी अनेकदा मुख्यालयी अनुपस्थित राहून बैठकीत आहे. दुसऱ्या गावी आहे, अशी कारणे देत जबाबदारी टाळतात. अनेक गावचा कारभार एकाच ठिकाणांहून पाहण्याचा सर्रास प्रकार सुरू असून, नागरिकांच्या कामाकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. गटविकास अधिकारी बेजबाबदार ग्रामसेवकावर काय कारवाई करतात याकडे नागरिकांचे लक्ष लागले होते, परंतु गटविकास अधिकारीच या गोष्टीकडे दुर्लक्ष करत असल्याने शेवटी देगलूर, बिलोली विधानसभेचे आमदार जितेश अंतापूकर हे हिवाळी अधिवेशनात समस्या मांडतील, अशी अपेक्षा सुज्ञ नागरिकांकडून केली जात आहे.

# जिल्ह्यात ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ

## सैनिकांच्या कल्याणासाठी ध्वजदिन निधीस प्रत्येकाने योगदान द्यावे –अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** देशसेवेत सैनिकांच्या अतुलनीय योगदानामुळे प्रत्येक देशवासियांच्या मनात सैनिकाबद्दल सर्वोच्च स्थान आहे. सैनिकांच्या कल्याणासाठी ध्वजदिन निधी संकलनाच्या माध्यमातून त्यांचे ऋण फेडण्याची संधी आहे. प्रत्येक नागरिकांनी ध्वजदिन निधीस आपले जास्तीत जास्त योगदान द्यावे, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी केले.

जिल्हा सैनिक कार्यालया-मार्फत काल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवनात ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, विविध माजी सैनिक संघटनांचे अध्यक्ष



रामराव थडके, पठाण हयुन, लक्ष्मण देवदे, दत्ता पोतगन्ते, प्रकाश कस्तुरे, विठ्ठल कदम, ज्ञानेश्वर डूमणे, नागनाथ बासरे, कमलाकर शेटे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात शहिदांना श्रद्धांजली वाहून करण्यात आली. प्रास्ताविकात निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी ध्वजदिन निधीचे महत्त्व सांगून संकलित झालेल्या निधीचा विनियोग व माजी सैनिकांच्या पुनर्वसनासाठी विविध कल्याणकारी योजना कशा राबविण्यात येतात याची माहिती दिली.

वर्ष २०२४-२५ साठी शासनाने जिल्ह्याला ५० लाख ५० हजार रुपये एवढे उद्दिष्ट दिले होते. यात नांदेड जिल्ह्याने ३० लाख ४० हजार रुपये जमा करुन ६०.१९ टक्के पूर्ण केले आहे. वर्ष २०२५-२६ साठी शासनाकडून ५० लाख ५० हजार एवढे उद्दिष्ट मिळाले असून, हे उद्दिष्ट निर्धारित वेळेत पूर्ण करण्यात येईल, असे निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी सांगितले.

दिलेले उद्दिष्ट वेळेच्या आत पूर्ण केल्याबद्दल शासनाने नांदेड जिल्ह्याच्या गौरवाप्रीत्यर्थ स्मृतीचिन्ह देवून सत्कार केला आहे. या संकलनात जिल्ह्यातील ज्या शासकीय, निमशासकीय कार्यालये तथा महाविद्यालय यांनी मोलाचे सहकार्य केले त्यांचा अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला.

# आष्टूर येथील यात्रेनिमित्त श्री दत्तप्रभू यांच्या मूर्तीचे प्रतिभाताई चिखलीकर यांच्या हस्ते पूजन



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील आष्टुर येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात श्री दतप्रभू यांचे जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम साजरे करण्यात आले. आमदार प्रतापराव पाटील यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते श्री दतप्रभू यांची आरती व पूजा करण्यात आली. त्यानंतर माजी सभापती आनंदराव पाटील, शरद पवार आदी मान्यवरांच्या हस्ते कुस्तीचे उद्घाटन पार पडले. त्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

लोहा पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील, माजी उपाध्यक्ष शरद पाटील पवार, माजी सरपंच मधुकर बाबर, बाळू बाबर, डॉ. शिंदे, युवक कॉंग्रेस तालुकाध्यक्ष बाबासाहेब बाबर, स्वीय सहायक मारुती जाधव, तुकाराम दाढेल, व्यंकट जंगले, अकबर शेठ, दत्ता बंजपल्ले यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

कुस्तीच्या फडाचे उद्घाटन माजी सभापती आनंदराव पाटील व माजी उपनगराध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

# क्रिकेटपटू गंगा कदम यांना शासकीय नोकरी द्यावी

## आ. हेमंत पाटील यांची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आंतरराष्ट्रीय दिव्यांग दृष्टिहीन क्रिकेट खेळाडू तथा दृष्टिहीन महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार कु. गंगा संभाजी कदम यांना राज्य शासनाकडून शासकीय नोकरी देण्यात यावी. तसेच प्रोत्साहनात्मक मानधन मिळावे, अशी मागणी मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील यांनी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे केली. सोबतच राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे आणि दिव्यांग कल्याण विभाग यांच्याकडे सुद्धा केली.

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील फुटाणा येथील कु. गंगा संभाजी कदम यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थिती घरातील अडचणी आणि अपंगत्व यावर मात करून क्रिकेटसारख्या जागतिक दर्जाच्या खेळात



चमकदार कामगिरी करत भारतीय दृष्टिहीन महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार पदाची धुरा यशस्वी सांभाळली आणि देशाला श्रीलंका येथे झालेल्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत विश्वचषक मिळवून दिला. या विजयाचा जल्लोष देशभरात साजरा करण्यात आला. एवढी मोठी कामगिरी करणारी कु. गंगा कदम ही आपल्या भागातील मराठवाड्याच्या मातीतील लेक असल्याचा अभिमान असल्याची भावना आमदार हेमंत पाटील यांनी व्यक्त केली.

नुकताच फुटाणा येथे कु. गंगा कदम यांचा 'सन्मान लेकी'चा या कार्यक्रमांतर्गत नागरी सत्कार व सन्मान करण्यात आला. यावेळी आ. हेमंत पाटील यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना आर्थिक मदत सुद्धा दिली. आपल्या राज्याची मान अभिमानाने उंचविणाऱ्या खेळाडूंचा सन्मान करण्यासाठी याहीपुढे जाऊन आमदार हेमंत पाटील यांनी कु. गंगा कदम यांना राज्य शासनाने शासकीय नोकरी द्यावी व प्रोत्साहनात्मक मानधन मिळावे अशी मागणी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे आणि सोबतच राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे व दिव्यांग कल्याण विभाग यांच्याकडे सुद्धा केली.

### स्मशानभूमीवरील भाडेपट्टा रद्द करुन जागा कायम ठेवण्याची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –मौजे वाडी पुयड येथील बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीवरील भाडेपट्टा रद्द करून जागा कायम ठेवण्यात यावी, अशी मागणी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मौजे वाडी पुयड येथे गट नं. २४ मध्ये बौद्ध स्मशानभूमी आहे जी १७ आर जागेत असून ही स्मशानभूमी बौध्द समाजाची पारंपरिक आहे, पण प्रशासनाने व महावितरण कंपनीने १७ आर जमीन ही जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने एमएसकेव्हीवाय या योजनेअंतर्गत ३३/११ के. व्ही. उपकेंद्रासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्यावर देऊन बौध्द समाजावर अन्याय केला असल्याचे निवेदनात नमूद करून ३० वर्षाचा केलेला भाडेपट्टा रद्द करून स्मशानभूमीची जागा कायम ठेवण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

या निवेदनावर प्रकाश तारू, आनंदा तारू, इंदुप्रकाश तारू, काळबा गजभारे, विश्वांभर तारू, राजू तारू, गंगाधर तारू, बालाजी तारू, गंगाधर तारू, रमेश तारू आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बिलोली, धर्माबाद, देगलूरमधील बॅक वॉटरमुळे निर्माण होणाऱ्या संकटावर कायमस्वरूपी तोडगा काढा -खा. डॉ. अजित गोपछडे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील बिलोली, धर्माबाद आणि देगलूर या तालुक्यांमध्ये तेलंगणातील श्रीराम सागरच्या बॅक वॉटरमुळे निर्माण होणारी विदारक परिस्थिती आणि अपरिमित हानीबाबत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज राज्यसभेत प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टरवरील पिकांना दरवर्षी बसणारा फटका, गावकऱ्यांचे होणारे नुकसान आणि त्यातून निर्माण होणारे आर्थिक संकट यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र आणि तेलंगणा सरकारमध्ये सरकारची संयुक्त बैठक बोलविण्यासाठी तातडीने समिती स्थापन करावी अशी मागणीही त्यांनी केली.



राज्यसभेच्या आजच्या अधिवेशनात खा. डॉ. अजित गोपछडे यांनी महाराष्ट्रातील नांदेड जिल्ह्यात दरवर्षी निर्माण होणाऱ्या मानवनिर्मित बॅकवॉटर पूरपरिस्थितीचा मुद्दा प्रभावीपणे मांडला. बिलोली, धर्माबाद आणि देगलूर तालुक्यातील ८० हून अधिक गावे तेलंगणातील श्रीराम सागर प्रकल्पाच्या (SRSP/ पोचमपाड जलाशय) विसंगत व अवैज्ञानिक जलसंचालनमुळे गंभीर पूर संकटाला तोंड देत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक गावांची संपूर्ण शेती दरवर्षी पाण्याखाली जात असून पिके, पशुधन, घरे व गावांचा पायाभूत संरचनेचे प्रचंड नुकसान होत आहे. या अनुषंगाने आज सभागृहात प्रश्न उपस्थित करताना खा. डॉ. अजित गोपछडे म्हणाले की, ही नैसर्गिक आपत्ती नसून प्रशासनातील समन्वयाअभावी निर्माण झालेली मानवनिर्मित शोकांतिका आहे.

दरवर्षी पावसाळ्यात अचानक वाढणाऱ्या या बॅकवॉटरमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य, उपजीविका आणि मानसिक स्थिती उदध्वस्त होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे केंद्र सरकार, विशेषतः केंद्रीय जल आयोगाने महाराष्ट्र, तेलंगणा संयुक्त जल-समन्वय यंत्रणेची स्थापना करावी. वैज्ञानिक व बंधनकारक जलसंचालन नियमावली तयार करून कठोर पालन करावे. सर्व प्रभावित गावांचे जिओ-टॅग सर्वेक्षण करून DBT द्वारे कायम (स्थायी) मावेजा देण्यात यावा. केंद्राच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय तांत्रिक प्रशासकीय समिती स्थापन करावी. नांदेडच्या सीमांत भागातील शेतकऱ्यांची ही वार्षिक शोकांतिका तातडीने थांबवण्याची वेळ आल्याचे सांगत डॉ. गोपछडे यांनी केंद्र सरकारने निर्णायक पावले उचलून कायमस्वरूपी उपाययोजना अंमलात आणाव्यात, अशी विनंतीही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्र सरकार आणि सभागृहाला केली आहे.

# महात्मा गांधी विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

**मुदखेड (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगाचे निरीक्षण करून ज्ञान संपादन करावे. तसेच ज्ञानाचा वापर विवेक बुद्धीने करून आपले जीवन फुलवावे, असे प्रतिपादन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे आयोजित ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रमुख पाहुणे म्हणून आनंद देऊळगावकर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य तथा मुख्याध्यापक बाबुराव नाईक होते.

यात्प्रसंगी मुदखेडचे माजी नगराध्यक्ष तथा महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी यांनी 'विज्ञान शाप की वरदान' या विषयावर मार्गदर्शन केले. त्याचबरोबर गटशिक्षणाधिकारी सौ. प्रिया डहाळे यांनी ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करून प्रत्येक प्रयोगाची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी संस्थेचे सचिव लक्ष्मणराव सोनटक्के, कोषाध्यक्ष शंकरराव पचलिंग, नायब तहसीलदार जगताप, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे, उपप्राचार्य अभया लोहगावकर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.



या प्रदर्शनाचा मुख्य विषय विकसित आणि आत्मनिर्भर भारत असा होता आणि उपविषयक शाश्वत शेती हरित ऊर्जा कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिकला पर्याय उदयन्मुख तंत्रज्ञान आरोग्य आणि स्वच्छता जलसंवर्धन आणि व्यवस्थापन इत्यादी विषयाचा समावेश होता.

प्रारंभी गटशिक्षणाधिकारी प्रिया डहाळे तसेच माजी नगराध्यक्ष राम चौधरी, लक्ष्मणराव सोनटक्के, शंकरराव पचलिंग यांच्या हस्ते तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. या तालुकास्तरीय प्रदर्शनामध्ये एकूण ४९ प्रयोगाची नोंदणी झाली. त्यामध्ये प्राथमिक गटातून जि. प. केंद्रीय प्राथमिक कन्या शाळा बारडच्या समीक्षा देशमुखने प्रथमे तर द्वितीय क्रमांक सृष्टी पुयड, जि. प. प्राथमिक शाळा डोंगरगाव तर तृतीय क्रमांक स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू विद्यालय भारत प्रथमेश केवार यांनी मिळवला आहे.

तसेच माध्यमिक गटातून जि. प. हायस्कूल रोही पिंपळगाव अंशुमन डुकरे यांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे तर द्वितीय शिवम देवठाणकर, तृतीय व्यंकटेश चुचे, सरदार वल्लभाई पटेल मुदखेड यांनी मिळवला आहे. या प्रदर्शनाचे परीक्षण प्रा. डी. जी. गरुडकर, पवार बी. पी., रावते एस. जी. यांनी केले आहे. या कार्यक्रमासाठी माधवराव कुलकर्णी, राम हेंबाडे, सौ. सरोजिनी लाभसेटवार, सौ. सुरेखा सोनटक्के, जितेंद्र गायकवाड, राम गायकवाड, दिनेश शेटे, प्रा. मंगनाळे, प्रा. सूर्यकांत गोंड, हौसाजी गाढे इत्यादीसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी घेतले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजीव डोणगावकर तर आभार संजय राजे यांनी मानले आहे.

# अंतर्मन



## महिलांनी रात्रीच्या वेळी चुकूनही करू नयेत या 6 गोष्टी

**घरात देवी अलक्ष्मी वास करू शकते, नकारात्मकता तुम्हाला त्रास देईल...**

**आपण जे काही काम करतो, त्याचा थेट परिणाम आपल्या जीवनावर होत असतो. दान-पुण्य करण्यापासून ते संध्याकाळी नखे कापण्यापर्यंत त्याचा परिणाम आपल्या व्यक्तिमत्त्वावर, करिअरवर आणि जीवनावर दिसून येतो. शास्त्रानुसार रात्रीच्या वेळी म्हणजे सूर्यास्तानंतर महिलांनी ६ गोष्टी चुकूनही करू नयेत. असे केल्याने, नकारात्मकता तुम्हाला त्रास देऊ शकते आणि सकारात्मकता जीवनातून दूर जाऊ लागते. अशा स्थितीत एकामागून एक समस्यांना सामोरे जावे लागू शकते आणि घरात देवी अलक्ष्मी वास करू शकते. चला जाणून घेऊया महिलांनी रात्रीच्या वेळी कोणती कामे करणे टाळावे...**

### रात्री केस मोकळे सोडून झोपू नका

असे मानले जाते की महिलांनी सूर्यास्तानंतर केस मोकळे सोडू नयेत. मोकळ्या केसांनी झोपू नये. असे म्हणतात की यामुळे नकारात्मक शक्ती आकर्षित होतात. केसांद्वारे अनेक प्रकारच्या तंत्र क्रिया केल्या जातात. यामुळेच केस मोकळे सोडल्याने नकारात्मक शक्ती आकर्षित होतात. अशा परिस्थितीत तुम्हाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागू शकते. शिवाय यामुळे कौटुंबिक समस्याही वाढू शकतात.

### रात्री चुकूनही परफ्यूम लावू नका

जर तुम्ही रात्री अत्तर लावून झोपत असाल किंवा परफ्यूम लावून एकटे बाहेर जात असाल तर असे अजिबात करू नका. असे मानले जाते की परफ्यूमचा वास नकारात्मक शक्तींना आकर्षित करतो. अशा परिस्थितीत नकारात्मकता तुम्हाला त्रास देऊ शकते. यामुळे रात्री अत्तर लावून घराबाहेर पडू नये आणि एकटे राहू नये. महिलांसोबत पुरुषांनीही रात्रीच्या वेळी परफ्यूम वापरणे टाळावे.

### रात्री नखे कापण्यास मनाई

संध्याकाळी घरात लक्ष्मीचे आगमन होते असे मानले जाते. अशा स्थितीत काही कामे सूर्यास्तानंतरही करू नयेत. रात्री चुकूनही नखे कापू नयेत. असे केल्याने देवी लक्ष्मी क्रोधित होऊ शकते आणि घरात अलक्ष्मीचा प्रवेश होऊ शकतो. ज्यामुळे व्यक्तीला गरिबीचा सामना करावा लागू शकतो. याशिवाय घराशी संबंधित समस्याही तुम्हाला सतावू लागतात. त्यामुळे सूर्यास्तानंतर चुकूनही नखे कापू नयेत.



### सूर्यास्तानंतर केस विंचरू नये

अनेक वेळा बाहेरून आल्यावर केस खूप विस्कटलेले राहतात. अशा स्थितीत महिला रात्री केस विंचरून झोपतात. परंतु शास्त्रात ते चांगले मानले जात नाही. मान्यतेनुसार, सूर्यास्तानंतर महिलांनी चुकूनही केस विंचरू नयेत. त्यामुळे तुटलेले केस घरभर पसरतात आणि संध्याकाळची वेळ लक्ष्मीच्या आगमनाची असते. अशा स्थितीत देवी लक्ष्मी क्रोधित होऊन घरात अलक्ष्मीचा प्रवेश होऊ शकतो. म्हणून, सूर्यास्तापूर्वी केसांना कंघी करणे चांगले मानले जाते.

### रात्री कोणतेही भांडण टाळा...



चांगल्या झोपेसाठी रात्री शांत मन असणे खूप गरजेचे आहे. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी कोणत्याही प्रकारचे वाद आणि मारामारीपासून दूर राहावे. सूर्यास्तानंतर असा कोणताही मुद्दा उपस्थित करू नये, ज्यामुळे वाद होऊ शकतो. अशा परिस्थितीत आजूबाजूला नकारात्मकता पसरते आणि मन अस्वस्थ राहते. त्यामुळे झोपेवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम दुसऱ्या दिवशीही होतो.

### रात्री मोठ्याने हसणे टाळा

असे मानले जाते की रात्री कधीही मोठ्याने हसू नये. कारण सूर्यास्तानंतरची वेळ शांत असावी. यामुळे चांगली झोप तर मिळतेच पण सकाळची सुरुवातही चांगली होते. त्याच वेळी, असे मानले जाते की रात्री मोठ्याने हसणे पुढील दिवस खराब करू शकते आणि यामुळे नकारात्मक ऊर्जा देखील आकर्षित होते. यामुळेच रात्री मोठ्याने हसणे वर्ज्य मानले जाते.

# 'इंडिगो'च्या स्थापना कुंडलीत परिवर्तनकारी दशा आहे सुरू!

## सर्वात मोठ्या विमान कंपनीचे भविष्य...

**भारतातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगो सध्या सर्वात मोठ्या संकटाचा सामना करत आहे. ज्यामुळे केवळ तिच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले नाही तर देशाच्या विमान वाहतूक क्षेत्राच्या प्रतिष्ठेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. गेल्या काही दिवसांत इंडिगोने २००० हून अधिक उड्डाणे रद्द केली आहेत. ज्यामुळे लाखो प्रवाशांची गैरसोय झाली आहे आणि देशभरातील अनेक प्रमुख विमानतळांवर गोंधळ उडाला आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने नवीन फ्लाइट ड्युटी टाइम लिमिटेशन (FDTL) नियम लागू केले, ज्याचा उद्देश वैमानिकांना थकवा कमी करण्यासाठी अधिक रजा देणे होता. सरकारने सर्व विमान कंपन्यांना हे नवीन नियम लागू करण्यासाठी पुरेसा वेळ दिला. परंतु आधीच स्टाफ आणि वैमानिकांच्या कमरतेचा सामना करणाऱ्या आणि स्वस्त विमान सेवा देण्याचा दावा करणाऱ्या इंडिगोने सरकारी आदेशांचे स्पष्टपणे उल्लंघन केले. ज्योतिषशास्त्रीय दृष्टिकोनातून, इंटरग्लोब एव्हिएशन लिमिटेड म्हणजेच इंडिगोची स्थापना कंपनी कायदा १९५६ अंतर्गत ११ ऑगस्ट २००६ रोजी झाली. इंडिगोच्या स्थापना कुंडलीतील सर्व प्रमुख ग्रह वाढीच्या तिसऱ्या, सहाव्या, दहाव्या आणि अकराव्या घरात असल्याने कंपनीने काही वर्षांतच तिच्या सर्व स्पर्धकांना मागे टाकले. या ग्रहांनी इंडिगोला भारतीय आकाशाचा राजा बनवले.**




### इंडिगो इतक्यात हार मानणारी नाही...

स्वतंत्र भारताची स्थापना कुंडली (१५ ऑगस्ट १९४७, मध्यरात्री, दिल्ली) वृषभ लग्नात आहे, जिथे मंगळ सध्या अशुभ काळात आहे. मंगळ मारक असल्याने विमान वाहतूक क्षेत्रासाठी जबाबदार ग्रह राहूच्या नक्षत्रात आहे. परिणामी, फेब्रुवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या काळात मंगळ ग्रहावर राहूच्या विंशोत्तरी काळात केंद्र सरकार विमान उद्योगासाठी काही नवीन नियम लागू करू शकते. मंगळ ग्रहावर राहूच्या अंतर्दशा दरम्यान फेब्रुवारी २०२६ नंतर एक नवीन कंपनी विमान उद्योगात प्रवेश करू शकते आणि या क्षेत्रात परदेशी गुंतवणूक देखील वाढेल. गुरुच्या महादशामध्ये शुक्राच्या अंतर्दशाच्या प्रभावामुळे इंडिगो एअरलाइन्सला एप्रिल २०२७ पर्यंत मोठ्या आव्हानांना तोंड द्यावे लागेल. तथापि, तिच्या मजबूत स्थापना कुंडलीच्या बळावर ही कंपनी पुढील काही वर्षे भारतातील सर्वात मोठी विमान कंपनी राहू शकते.

### परिवर्तनीय टप्प्यात इंडिगोची बिघडली स्थिती

ज्योतिषशास्त्रात गुरुत शुक्र आणि शुक्र राशीतील गुरूचे विंशोत्तरी चरण आमूलाग्र बदल घडवून आणणारे मानले जातात. ज्यामुळे कधीकधी असह्य दुःख होते. जरी गुरू आणि शुक्र हे दोन्ही नैसर्गिकरित्या शुभ ग्रह असले तरी, त्यांच्या शत्रुत्वामुळे, त्यांच्या परस्पर दशा आणि अंतरदशा कधीकधी खूप शुभ किंवा खूप अशुभ परिणाम देऊ शकतात. इंडिगो एअरलाइन्सच्या स्थापना कुंडलीत वृषभ लग्नासह, महादशा स्वामी गुरू स्पर्धेच्या सहाव्या घरात आहे, आठव्या (वाद) आणि अकराव्या (लाभ) घरात राज्य करतो. सप्टेंबर २०१६ मध्ये सुरू झालेल्या गुरूच्या महादशा दरम्यान, इंडिगोने भारताच्या विमान वाहतूक बाजारपेठेचा ६० ते ७० टक्के हिस्सा काबीज केला होता. ऑगस्ट २०२४ मध्ये गुरु राशीच्या महादशामध्ये शुक्र अंतरदशा सुरू झाली. ११ डिसेंबर २०२५ ते २० एप्रिल २०२६ पर्यंत गुरु राशीच्या शुक्रात गुरुचा विंशोत्तरी काळ इंडिगोवर मोठा भार टाकण्याची शक्यता आहे. केंद्र सरकार या वेळी इंडिगोवर मोठा दंड आकारू शकते, ज्यामुळे सर्वोच्च न्यायालयात खटला सुरू होण्याची शक्यता आहे.

# चुकूनही बेडरूममध्ये ठेवू नका या गोष्टी!

## पती-पत्नीमधील नाते बिघडू शकते, आर्थिक समस्या वाढू शकतात...

**वास्तुशास्त्रात बेडरूम खूप महत्वाचे मानले जाते. त्याचा पती-पत्नीमधील नातेसंबंधावर आणि त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर थेट परिणाम होतो. बेडरूम ही अशी जागा आहे, जिथे व्यक्ती दिवसभराच्या थकव्यानंतर आराम करते. कधी कधी आपण नकळतपणे बेडरूममध्ये काही वस्तू इकडे तिकडे ठेवून देतो. ज्याचा आपल्या जीवनावर खोलवर परिणाम होतो. या वस्तू आर्थिक कल्याणावर परिणाम करतात आणि संपत्तीशी संबंधित समस्या निर्माण करतात, असे मानले जाते. वास्तुशास्त्रानुसार रात्री बेडरूममध्ये काही वस्तू ठेवल्याने आर्थिक अडचणी वाढतात. झोपताना बेडरूमपासून कोणत्या वस्तू दूर ठेवाव्यात ते जाणून घेऊया...**



### फाटलेले आणि जुने कपडे

प्रथम कपड्यांबद्दल बोलूया. वास्तुशास्त्रानुसार, घरात फाटलेले आणि जुने कपडे ठेवणे अशुभ मानले जाते. हे कपडे नकारात्मक ऊर्जा आकर्षित करतात आणि आर्थिक अडचणी निर्माण करतात. म्हणून, बेडरूममध्ये वापरण्यायोग्य नसलेले कपडे बाहेर फेकून द्यावेत. ज्योतिषशास्त्रानुसार, घरात फाटलेले आणि जुने कपडे ठेवल्याने देवी लक्ष्मी दूर जाते.

- शयनकक्षात बूट आणि चप्पल : लोक अनेकदा बूट आणि चप्पल घालून घरात प्रवेश करतात. बेडरूममध्ये बूट आणि चप्पल ठेवणे हा वास्तु दोष मानला जातो. याचा पती-पत्नीमधील नात्यावर नकारात्मक परिणाम होतो आणि त्यांच्यात तणाव निर्माण होतो. त्यामुळे आर्थिक अडचणी देखील निर्माण होतात. म्हणून, बूट आणि चप्पल घराबाहेर ठेवावेत.
- बेडरूममध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू : वास्तुशास्त्रानुसार, बेडजवळ मोबाईल फोन, लॅपटॉप, टेलिव्हिजन आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे ठेवणे हे आर्थिक समस्यांचे कारण मानले जाते. ही उपकरणे नकारात्मक ऊर्जा आणि रेडिएशन उत्सर्जित करतात. ज्यामुळे झोपेचा अभाव आणि मानसिक त्रास होऊ शकतो. म्हणून, झोपण्यापूर्वी सर्व उपकरणे बंद करणे चांगले.
- बेडरूममध्ये देवाची मूर्ती : बेडरूममध्ये देवाचा फोटो किंवा मूर्ती ठेवणे हा वास्तुदोष मानला जातो. पूजास्थळ नेहमी प्रार्थना कक्षात ठेवावे. बेडरूम ही पती-पत्नीमधील झोपेसाठी आणि खासगी क्षणांसाठी आहे. बेडरूममध्ये देवाची मूर्ती किंवा धार्मिक ग्रंथ ठेवल्याने घरात प्रतिकूल परिस्थिती निर्माण होऊ शकते.
- आरशांचा अयोग्य वापर : वास्तुशास्त्रानुसार, बेडरूममध्ये बेडसमोर कधीही आरसा ठेवू नये. जरी आरसा लावला असला तरी तो रात्री झाकून ठेवावा. वास्तुनुसार, बेडरूममध्ये आरसा ठेवल्याने नातेसंबंधांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. यामुळे वैवाहिक जीवनात मानसिक अशांतता आणि ताणतणाव वाढतो.

# करोडपती लोकांच्या हातात असतात या खास रेषा, तपासून घ्या तुमच्याही हातात तर नाही ना राजयोग?

**हस्तरेषाशास्त्रानुसार हातावरील रेषा आपल्या भविष्याचा आरसा आहेत. या रेषांद्वारे जीवनातील घटनांचा अचूक अंदाज लावता येतो. हातावरील काही खास चिन्हे आणि रेषा अत्यंत भाग्यवान मानल्या जातात. या रेषा एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात आर्थिक लाभ आणि प्रचंड यश दर्शवतात. प्रत्येकाकडे हे गुण नसतात. जर तुमच्याकडे या विशिष्ट रेषा असतील तर त्या तुम्हाला करोडपती बनवू शकतात. चला जाणून घेऊया कोणत्या भाग्यवान रेषा तुम्हाला करोडपती बनवू शकतात...**

- हातावर सूर्य रेषा : हातावर सूर्य रेषा ही हस्तरेषाशास्त्रातील सर्वात महत्त्वाची रेषा मानली जाते. तिला भाग्य आणि प्रसिद्धीची रेषा देखील म्हणतात. तुमच्या हातावर स्पष्ट, खोल आणि सरळ रेषा सौभाग्याचे संकेत देते. अशा लोकांना जीवनात आर्थिक यश मिळते. जर सूर्य रेषा थेट सूर्य पर्वतापर्यंत पसरली तर व्यक्तीला संपत्ती तसेच समाजात आदर मिळतो.
- हातावर भाग्य रेषा : भाग्य रेषा ही यशाचे प्रतीक मानली जाते. ती तुमच्या तळहाताच्या तळापासून सुरू होते आणि हाताच्या मध्यभागी जाते. ही रेषा जितकी स्पष्ट असेल तितक्या लवकर व्यक्ती जीवनात प्रगती करते. जर भाग्य रेषा शुक्र पर्वत किंवा चंद्र पर्वतापासून उगम पावली असेल तर अशा व्यक्ती व्यवसाय आणि राजकारणात मोठे यश मिळवतात. तथापि, जर भाग्य रेषा शनि पर्वतापर्यंत पोहोचली तर व्यक्ती राजयोगाचा आनंद घेते.



- हातावर धन रेषा : हातावर धन रेषा हस्तरेषाशास्त्रात देखील खूप शक्तिशाली मानली जाते. लहान असूनही ही रेषा व्यक्तीच्या जीवनावर खोलवर प्रभाव पाडते. असे मानले जाते की ज्या लोकांची धन रेषा सूर्य पर्वत किंवा बुध पर्वताकडे वळते ते व्यवसाय, गुंतवणूक आणि संपत्ती वाढीमध्ये अत्यंत यशस्वी होतात. या लोकांना अनेकदा अचानक आर्थिक लाभ होतो.
- तळहातातील जीवनरेषा : हस्तरेषाशास्त्रात, मस्तक रेषा आणि जीवनरेषेचे योग्य स्थान देखील आर्थिक लाभाचे लक्षण मानले जाते. जर दोन्ही रेषा एकमेकांपासून थोड्या अंतरावर असतील आणि तळहाताच्या मध्यभागी स्पष्टपणे दिसतील तर अशा लोकांना हळूहळू आर्थिक यश मिळते. जर मस्तक रेषा लांब असेल तर व्यक्तीकडे जास्त व्यावहारिक बुद्धिमत्ता असते.
- हातातील शुक्र पर्वत : हातातील अंगठ्याजवळील उंच भागाला हस्तरेषाशास्त्रात शुक्र पर्वत म्हणतात. ते प्रेम, आकर्षण, संपत्ती आणि भौतिक सुखांचे प्रतिनिधित्व करते. जर शुक्र पर्वत उंच आणि चमकदार असेल तर अशा लोकांना संपत्ती आणि समृद्धी प्राप्त होते.

## रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



## पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




१५० दिवसीय ई-गव्हर्नन्स कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा व्हॉट्सॲप चॅटबॉट कार्यान्वित

# व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित माहिती होणार उपलब्ध

## नागरिकांनी व्हॉट्सॲप चॅटबॉट प्रणालीचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन




**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र शासनाच्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स कार्यक्रमाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने व्हॉट्सॲप चॅटबॉट प्रणालीची सुरुवात केली आहे. नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि सुलभ प्रशासनाचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सुविधा विकसित करण्यात आली आहे. तरी या सुविधेचा जास्तीत-जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा चॅटबॉट मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये उपलब्ध असून, जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित सर्वसमावेशक माहिती नागरिकांना सहज मिळावी यादृष्टीने त्याची रचना करण्यात आली आहे. यासाठी क्युआर कोड स्कॅन करा किंवा ८६६८२२३३२६ या क्रमांकावर व्हॉटसॲप संदेश पाठवा आणि जिल्हाधिकारी नांदेड यांच्या माहिती, तक्रारी, योजना व संदर्भातील व्हॉट्सॲप सुविधांचा लाभ घ्या, असे आवाहन करण्यात आले आहे.

व्हॉट्सॲप चॅटबॉटच्या माध्यमातून पुढीलप्रमाणे माहिती नागरिकांना सहज उपलब्ध होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाबद्दलची परिपूर्ण माहिती, अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील, विविध विभाग व शासकीय योजनांची माहिती, आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शक सेवा, तक्रार निवारणासाठी आवश्यक दुवे व माहिती.

नांदेड जिल्ह्यातील नागरिकांना जास्तीत-जास्त दोन क्लिकमध्ये आवश्यक माहिती मिळावी, हा या प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड व्हॉट्सॲप चॅटबॉटमध्ये खालील सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरी सेवा, वरिष्ठ अधिकारी व विभागनिहाय संपर्क, जिल्हाधिकारी शाखांची माहिती, शासकीय योजना व आरटीएस सुविधा, आपत्ती व्यवस्थापन, तक्रार निवारण प्रणाली, जमीन व महसूल इ. सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

नागरिकांना आवश्यक सुविधा सुलभ, पारदर्शक आणि तांत्रिक पद्धतीने उपलब्ध व्हाव्यात यासाठी हा उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

शिवसेना दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या पुढाकारातून

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा येथे अखेर तिसऱ्या दिवशी दुचाकी वाहनांसाठी पर्यायी रस्ता



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – सिडको नांदेड-लातूर फाटा दरम्यान महामार्गावर पुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे ग्रेडरसाठी गेल्या तीन दिवसांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा हा रस्ता बंद केल्याने सिडको-हडको मार्गाने ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत आहे. शिवसेनेचे दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे व शहरप्रमुख सुहास पाटील खराणे यांच्यासह पदाधिकारी यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पर्यायी रस्ता करून देण्याची मागणी केल्यानंतर अखेर तिसऱ्या दिवशी दुचाकी वाहनांसाठी पर्यायी रस्ता करण्यात आला आहे त्यामुळे वाहतूक काहीशी सुरळीत झाली आहे.

नागपूर - नांदेड - लातूर महामार्गासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा येथे गेल्या अनेक दिवसांपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा येथे पुलावर ग्रेडर टाकण्याचे काम चालू आहे. हे काम अंतिम टप्प्यात असल्याने दोन दिवसांपूर्वी हा रस्ता कोणतेही पूर्वसुचना न देता अचानक बंद केला. त्यामुळे शालेय खाजगी शिकवणीला जाणाऱ्या विद्यार्थी व दुचाकी वाहनधारकांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या संबंधी नागरिकांनी केलेल्या तक्रारीची दखल घेत, शिवसेना जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे व पदाधिकारी यांनी संबंधित महामार्ग अभियंता पुयड व ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, शहर वाहतूक शाखा यांच्याशी चर्चा केली.

अखेर तिसऱ्या दिवशी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा येथे शिवसेना शिंदे गटाचे दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, सिडको शहरप्रमुख सुहास पाटील खराणे, उपशहर प्रमुख राजू टमान्ना, पप्पू गायकवाड, दत्ता पाटील काळे, दीपक देशपांडे, श्रीकांत पतलावे, योगेश माने यांनी संबंधित ठिकाणी भेट देऊन पाहणी केली व पर्यायी रस्ता म्हणून दुचाकी वाहनधारकांना हा रस्ता मोकळा करून दिला आहे, त्यामुळे अनेक दुचाकी वाहनधारकांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे.

# सेवानिवृत्त महिला कर्मचाऱ्याची २९ लाखांची फसवणूक; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहराच्या नाईकनगर भागात राहणाऱ्या एका सेवानिवृत्त महिलेस दोन आरोपींनी संगनमत करून २९ लाख रुपये घेऊन त्यांची फसवणूक केली. ही घटना पाच ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली.

नांदेड शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कांताबाई वसंतराव (बाबुराव) दहाने (वय ६३) सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना विश्वासात घेऊन दिगंबर परळे आणि अनिता परळे दोघे रा. नमस्कार चौक, नांदेड यांनी त्यांना कुठले तरी आमिष दाखविले. आमिषापायी श्रीमती दहाने यांनी २९ लाख रुपये दिले. परंतु घेतलेले पैसे परत न देता त्या दोघांनी सदर महिलेचा विश्वासघात करून फसवणूक केली. अखेर कांताबाई दहाने यांच्या फिर्यादीवरून विमानतळ पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार श्रीमती टाकळीकर करत आहेत.

## रामराव गजेले यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील देगाव येथील रहिवासी व ज्येष्ठ नागरिक रामराव विठोबा गजेले यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

कै. रामराव गजेले यांच्या पार्थिवावर शुक्रवार, दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता देगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

त्यांच्या पश्चात पत्नी, ६ मुले, देविदास, मष्ट्णा, धनाजी, बलभीम, अंगद, गोविंद यांच्यासह सुना, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार प्रल्हाद आयनेले यांचे ते मामा होत.

# स्वारातीम विद्यापीठात 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रम उत्साहात

## आविष्कार २०२६ संशोधन संमेलनातून तरुण मनांना संशोधनाची प्रेरणा



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये ९ डिसेंबर, २०२५ रोजी 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद शाळा, विष्णुपुरी तसेच परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभागी होत विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. हा कार्यक्रम 'आविष्कार २०२६' महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ संशोधन संमेलनाचा एक महत्त्वपूर्ण घटक ठरला. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण आणि संशोधनाबद्दल प्रेरणा निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या उपक्रमाला जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आय.ए.एस. मेघना कावली यांनी पाठिंबा दर्शवून या प्रभावी उपक्रमाबद्दल विद्यापीठाचे कौतुक केले. शालेय आणि उच्च शिक्षणातील अंतर कमी करणे व तरुण पिढीत नावीन्याची ज्योत पेटविण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी गरज आहे, असे त्या म्हणाल्या.

विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील संशोधन सहभागींनी सादर केलेल्या पोस्टर्स, मॉडेल्स, नवोन्मेषी प्रात्यक्षिके यांचे निरीक्षण केले. विविध विभागांच्या मार्गदर्शित भेटीत त्यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितले की, आजचे विद्यार्थी हे उद्याचे नाविन्यकर्ते आहेत. 'स्कूल कनेक्ट'मुळे आम्ही त्यांच्या तरुण मनात जिज्ञासा आणि संशोधनाची ओढ निर्माण करीत आहोत. त्यांना संशोधन आणि उच्च शिक्षणातील भविष्याची कल्पना करण्यास प्रोत्साहन देत आहोत.

शालेय स्तरापासून संशोधन केंद्रित विचारसरणी विकसित करण्याच्या विद्यापीठाच्या वचनबद्धतेवर त्यांनी पुन्हा एकदा भर दिला. 'स्कूल कनेक्ट' सारखे उपक्रम भविष्यातील विचारवंत आणि नेते घडवण्यासाठीच्या आमच्यावचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत, जे राज्याच्या सकल नोंदणी प्रमाण (जीईआर) वाढविण्याच्या ध्येयाशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एस. जे. वाढेर, आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि आविष्कार २०२६ च्या समन्वयक डॉ. रुपाली एस. जैन यांच्या समर्पित प्रयत्नामुळे शक्य झाला, ज्यांच्या सामुहिक वचनबद्धतेमुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

'स्कूल कनेक्ट' उपक्रमातून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक आकांक्षा आणि प्रत्यक्ष संशोधन अनुभव यांच्यातील दुवा अधिक मजबूत केला असून पुढील पिढीतील संशोधक व नाविन्यकर्त्यांना प्रेरित करण्याच्या दिशेने तो एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## के. बी. अबॅकसच्या सहा विद्यार्थ्यांचे चॅम्पियन, फर्स्ट आणि सेकंड रँकमध्ये प्रावीण्य

**नांदेड (प्रतिनिधी)**– शेगाव येथे ७ डिसेंबर रोजी सक्सेस पाथवे प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या संचालिका दर्शना देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय खुल्या अबॅकस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत के. बी. अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी विविध रँकमध्ये प्राविण्य प्राप्त केले.

या स्पर्धेमध्ये के. बी. अबॅकसच्या शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. दहा मिनिटात शंभर प्रश्न सोडविण्याचे आव्हान विद्यार्थ्यांसमोर होते. या स्पर्धेमध्ये श्रीनिधी कल्याणकर, अवनी नर्मितवार या विद्यार्थिनींनी चॅम्पियन तर फर्स्ट रँकमध्ये अवनीश पाटील, आदिती कदम तर सेकंड रँकमध्ये राजवीर राठोड, मन्मत डोरले, मधुरसिंग सोलंकी, प्रदेन नरवाडे, श्रीजा देशमुख आणि तृतीयमध्ये आशुतोष देवडे, कौशल नरवाडे, विभा बलफेवाड, कृष्णजा केंद्रे, श्रेया देशमुख, समर्थ मंगरुळे, रुद्र कंजे यांनी प्राविण्य प्राप्त केले. तसेच मितांत दळवी, नागेश हिंगमिरे, श्रुती बोंडले, पूर्वजा दळवी, वेदांत बलफेवाड, श्रेयस तोषटवाड, दिशांत मसुरे, नागेश हिंगमिरे, श्रुती बोंडले या विद्यार्थ्यांनीही ट्रॉफी व प्रमाणपत्र प्राप्त केले. प्रा. शिला सौंदडकर, प्रा. नम्रता भंग तसेच इंजिनियर सुमित सौंदडकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. के. बी. अबॅकसचे संचालक डॉ. सारनाथ सौंदडकर यांनीही विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे आभार मानले आणि विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी नेहमी ध्येय मोठे ठेवावे -डॉ. गीता लाटकर




**नांदेड (प्रतिनिधी)** – विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना आपले ध्येय नेहमी मोठे ठेवावे. तसेच बहुविद्याशाखीय कौशल्य विकसित करण्यावर आपले लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन एमजीएम कॉलेजच्या संचालिका डॉ. गीता लाटकर यांनी केले.

एमजीएम अभियांत्रिकी महाविद्यालय नांदेड येथे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या बी. टेक.च्या विद्यार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. अपस्तंभ विद्यार्थ्यांच्या सरस्वती स्तवनाने आणि दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरूवात झाली.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह पालकांनाही महाविद्यालयातील विविध प्रशासकीय माहिती त्या त्या विभाग प्रमुखांनी सांगितली. तसेच अभियांत्रिकी विभागातील विभागप्रमुखांनी त्यांच्या शाखेचे जगात काय महत्त्व आहे आणि विद्यार्थ्यांना त्यात असणाऱ्या संधी संबंधी माहिती दिली.

२०२५-२६ ची बॅच बी. टेक स्वायत्त महाविद्यालयाची पहिली बॅच असेल असेही त्या म्हणाल्या आणि विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा एकच गजर केला.

प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रमुख प्रा. नारायण कदम यांनी विद्यार्थ्यांना आत्मीय मार्गदर्शन केले. ते म्हणाले, महाविद्यालयात विद्यार्थ्यांना कोणतीच अडचण येणार नाही, त्यांनी फक्त वर्षभरातील तासिका आणि प्रात्यक्षिक मन लावून शंभर टक्के उपस्थितीसह पूर्ण करून उत्तम गुणांसह उत्तीर्ण व्हावे.

याप्रसंगी विभाग प्रमुख डॉ. अर्चना राजूरकर, डॉ. जसबीरसिंग सिद्धू, प्रोफेसर एस. ए. हाश्मी, डॉ. अर्षद हाश्मी, डॉ. कल्पना जोंधळे, शैक्षणिक समन्वय डॉ. सुभाष मुत्तेमवार, टीपीओ प्रा. शिवप्रसाद तीतरे, ग्रंथपाल डॉ. गोविंद हंबर्डे, एन. एस. एस समन्वय प्रा. पंकज पवार, स्पोर्ट ऑफिसर मनोजकुमार राठोड आदींची समयोचित भाषणे झाली.

यावेळी प्रोफेसर मंगल बनवसकर, प्रा. गजानन अडकिणे, प्रा. तुप्तेवार, प्रा. धनंजय जोशी, डॉ. विवेक कुडे, डॉ. चंदन सोमवंशी आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि प्रथम वर्षाचे विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना बी.टेक. अभ्यासक्रम, तासांचे व प्रात्यक्षिकाचे वेळापत्रक, परीक्षेतील गुणांकन नियम, ग्रंथालय माहितीपत्रक, महाविद्यालयात पाळावयाचे इतर नियम आदी लेखी माहिती असलेली फाईल आणि फुले देऊन स्वागत करण्यात आले.


कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मुरारी पावडे, प्रा. किरण देशमुख, गोपाळ जोशी, आशिष कांजाळकर, गोविंद जोगदंड, शिवाजी पावडे, मोहन शिंदे आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सत्पालसिंग गिल यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. राहूल शर्मा यानी मानले.

## क्षितिज जाधव यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हा सरचिटणीस क्षितिज जाधव व त्यांचा मुलगा श्रेयांशु यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त विविध उपक्रम घेण्यात आले.

सकाळी शहरातील महावीर चौक येथील पंचवटी हनुमान मंदिर परिसरात बेघर, गरजूंना अन्नदान करण्यात आले. त्यानंतर नेरली कुष्ठधाम येथे देखील अन्नदान वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या विविध उपक्रमासह सायंकाळी भगीरथ नगरातील तक्षशीला बुद्ध विहार परिसरात अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या अभीष्टचिंतन सोहळ्याला भाजपा माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, मिलिंद देशमुख, विजय गंभीरे, राजू यनम, सूर्यकांत कदम, मनोज जाधव, साईप्रसाद महाजन, उद्धव पावडे, प्रा. कमलाकर कणसे, संतोष कुलकर्णी, सुरेश काशिदे, बावस्कर, गौतम सरपाते, विलास देवळे, केशव रोडे, उद्धव पावडे, सिद्धार्थ कवठेकर, मतीन शेख शेख रफिक यांच्यासह अनेकांनी हजेरी लावुन क्षितिज जाधव व त्यांचा मुलगा श्रेयांशू यास शुभेच्छा दिल्या. विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी क्षितिज जाधव मित्र परिवाराचे मुकुंद धानोरकर, नामदेव केंद्रे, संदीप बिलोलीकर, कैलास वडजे, राजीव गायकवाड, बंडू गिरगावकर, कपिल तीमेवार, अमोल बुक्तरे, गणेश शिंदे, आकाश लेवडे, पवन जाधव, उमेश घुगे यांनी परिश्रम घेतले.






**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com